
# कृषितीर्थ

डिसेंबर २०२५ • वर्ष ७ • अंक १२ • जळगाव • पृष्ठे ५२ • मूल्य १०



## भाऊंचे गुरुकुल व शिक्षण पद्धती



हळद पिकामध्ये शुद्ध बियाणे निर्मितीची पद्धत नाही. त्यामुळे टिश्युकल्चर तंत्रज्ञानाने
बनविलेली हळदीची रोपे शेतकऱ्यास फायदेशीर ठरतील- भवरलाल जैन




**भवरलाल जैन**
संस्थापक अध्यक्ष -
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.

**जन्म :** १२ डिसेंबर १९३७
**निर्वाण :** २५ फेब्रुवारी २०१६
http://www.bhavarlaljain.in/

कृषितीर्थ

**संपादक**
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे;
वर्ष: ७; अंक: १० (७०) (डिसेंबर २०२५/
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी
संपादक व संचालक सहमत असतीलच
असे नाही.)

**मुद्रक, प्रकाशक**
मनिष अमृतलाल शहा यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. जळगाव यांच्यावतीने आनंद पब्लिकेशन, १०६/१/ए, एन. एच. क्र.५३, मुसळी फाटा, ता. धरणगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र) येथून छापून जैन प्लास्टिक पार्क, पोस्ट बॉक्स नं.७२, बांभोरी, जळगाव-४२५००१ येथून अंक प्रकाशित केला आहे.

**पत्ता :** जैन प्लास्टिक पार्क, रा.म.क्र. ५३, पो.बॉ. ७२, जळगाव-४२५००१ (महा.)
दूरध्वनी: ०२५७-२२५८०११;
ई-मेल: krushitirth@jains.com;
**संकेतस्थळ: www.jains.com**

**वर्गणी**
वार्षिक वर्गणी १०० रूपये. वर्गणीचा धनादेश 'कृषीतीर्थ जैन इरिगेशन' सिस्टीम्स लि, या नावाने काढावा.

आपण वर्गणी ऑनलाईन पद्धतीने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर जमा करू शकता.

बँक अकाऊंट - ३७६८८८३२७३८

IFSC Code - SBIN0007570

ब्रँच पत्ता - ९३, पोलन पेठ, दाणा बाजार, जळगांव. ४२५००१


# अनुक्रमणिका


**०४** **अध्यक्षीय - अशोक जैन - मोठे भाऊ हाडाचे प्रतिभावंत शिक्षक**



जैन इरिगेशन कंपनीमध्ये काम करणाऱ्या सहकाऱ्यांशी त्यांच्या पातळीवर जाऊन संवाद साधत काम पूर्णत्वाला नेण्याची व त्यासाठी सहकाऱ्यांचे शिक्षण व प्रशिक्षण करण्याची कला मोठ्या भाऊंनी ज्या पद्धतीने साधली त्या पद्धतीचा भाऊंच्या जयंतीनिमित्त घेतलेला आढावा

**०६** **संपादकीय - डॉ. सुधीर भोंगळे - भवरलाल भाऊंचे गुरुकुल व शिक्षणपद्धती**

जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन उर्फ मोठेभाऊ यांनी सहकाऱ्यांकडून काम उत्तम व यशस्वीपणे करून घेण्यासाठी जी कार्यपद्धती अवलंबिली ती त्यांची गुरूकुल शिक्षण पद्धती होती. मोठी विचारपूर्वक व अनुभव आणि अभ्यासाच्या पायावर उभ्या केलेल्या या शिक्षणपद्धतीची वैशिष्ट्ये, उपयोगिता आणि तिची फलश्रुती यांचा संपादकीय मधून घेतलेला धावता आढावा.



**२८** **लेख - डॉ. के.बी.पाटील - भाऊंच्या जिज्ञासेला अभ्यासपूर्ण खोली!**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काम करीत असताना डॉ. के.बी. पाटील यांचा मोठ्याभाऊंशी अनेकदा संबंध आला. त्यातून घनिष्ठ मैत्री व प्रेमाचे नाते निर्माण झाले. त्यामुळे विद्यापीठातली अनेक कामे भाऊंच्या मदतीने सहजपणे मार्गी लागली. या प्रेमाच्या मैत्रीपूर्ण आठवणींना डॉ. के.बी. पाटील यांनी भाऊंच्या जयंतीनिमित्त दिलेला उजाळा.

**३४** **लेख - डॉ. एन. के. ठाकरे - भाऊंच्या चिठ्ठीत गांधीतीर्थची बीजे**

डॉ. निम्बा कृष्णा ठाकरे हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे पहिले कुलगुरू झाले. त्यांना अनंत अडचणींचा सामना करून विद्यापीटाची उभारणी करावी लागली. ही उभारणी करताना जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन हे त्यांच्या मदतीला कसे धावून आले आणि त्यातून कामे कशी झटपट मार्गी लागली याची माजी कुलगुरु डॉ.एन.के. ठाकरे यांनी सांगितलेली कहाणी व गांधीतीर्थ उभारणीचे चिठ्ठीतून केलेले सूतोवाच.



**४२** **लेख - वासुदेव लक्ष्मण ठाकरे - भाऊंचे ठिबक तंत्रज्ञान शेतकऱ्यांवर अगणित उपकार!**



बामणोद येथील पडीक, खारवट जमीन मोठ्या भाऊंच्या मार्गदर्शनामुळे व त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या तंत्रज्ञान आणि साहित्यामुळे कशी उत्पादनक्षम झाली आणि पेरू, डाळींब व केळीच्या बागा उभ्या राहून आमची आर्थिक भरभराट झाली. बामणोदच्या प्रसिद्ध वांग्यांचे भरीत खात खात भाऊंनी आमच्या प्रगतीला जो मदतीचा हातभार लावला त्याची वासुदेवराव झांबरे या प्रगतशील शेतकऱ्याने (वय ९४) सांगितलेली मोठी उद्बोधक व रंजक कहाणी.

**४६** **लेख -एकनाथ बडगुजर - स्नेहाचा शिवार**

भुसावळ जवळील कुऱ्हेपानाचे या गावातील प्रगतशील शेतकरी एकनाथ राजाराम बडगुजर यांनी १९७९ साली मोठ्या भाऊंकडून प्रथम ट्रॅक्टर खरेदी केला आणि नंतर सातत्याने शेतीच्यासाठी लागणारी सर्व अवजारे व साहित्य मोठ्या भाऊंकडून ते खरेदी करीत राहिले. या खरेदी विक्रीतून त्यांच्यात जे प्रेमाचे, सहकार्याचे संबंध निर्माण झाले त्या संबंधांना भाऊंच्या जयंतीनिमित्त एकनाथ बडगुजर यांनी दिलेला उजाळा.



**४८** **लेख - डॉ. बाळकृष्ण यादव - स्थानिक तंत्रकुशल प्रतिभेचा विकास**



शेती क्षेत्रातील तंत्रज्ञानाधारित प्रगतीसाठी प्रशिक्षित स्थानिक मनुष्यबळ विकसित करणे हे भाऊंचे ध्येय होते. बी.टेक, बीई, बीएससी, एमएससी पदवीधारक सहकऱ्यांचे तांत्रिक ज्ञान वाढवण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले, ज्यामुळे प्रत्येक सहकारी आपल्या क्षेत्रात निष्णात बनू शकला हे सांगणारा हा लेख



**ता.क. - शेतीच्या क्षेत्रात शेतकऱ्यांनी कायम राहून त्यांची आर्थिक उन्नती व्हावी व ती शाश्वत राहावी यासाठी ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचा वापर व प्रसार होत राहणे आवश्यक आहे. हा जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक अध्यक्ष असलेल्या भवरलालजी जैन यांचा विचार होता. या विचारांना व ध्येयांना पुढे नेण्याच्या उद्देशाने कंपनी हे मासिक चालवित असून मासिकातील ज्ञान व माहिती सर्व शेतकऱ्यांनी अंगिकारावी व जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत ती पोहचावी हा आमचा हेतू आहे. तथापि ज्यांना या मासिकातील मजकूर पुनर्मुद्रित करून वापरायचे असल्यास त्यांनी कंपनीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# मोठे भाऊ
# हाडाचे प्रतिभावंत शिक्षक



जीवनाचे समग्र आणि एकात्म दर्शन ज्याच्याद्वारे घडू शकते असे शिक्षण गुरुकुल पद्धतीतून कार्यान्वित झाले. पूर्वी म्हणजे प्राचीन काळात विद्यार्थ्यांना ज्ञान संपादनासाठी गुरुगृही जाऊन राहावे लागत असे. आजचा काळ पूर्वीपेक्षा फार निराळा आहे. शाळेतले शिक्षण आजकाल बरेचसे पुस्तकी आणि घोकंपट्टीचे आहे. या शिक्षणाचा प्रत्यक्ष काम करताना आणि स्वतःचे जीवन उभे करताना फारसा उपयोग होत नाही. हे चित्र सर्व क्षेत्रांमध्ये पाहायला मिळते. कारखान्यात म्हणजे जिथे प्रत्यक्ष वस्तुचे उत्पादन करण्याचे काम चालते तिथे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यांची तर आवश्यकता असतेच, पण त्याच्या जोडीला अनुभव आणि तारतम्याचीही साथ असावी लागते. आमच्या कंपनीचे संस्थापक अध्यक्ष व आमचे परमपूज्य पिताजी भवरलालजी जैन उर्फ मोठे भाऊ यांनी शेतीमाल उत्पादनाच्या तंत्रापासून फूड प्रक्रियेपर्यंत आणि ठिबक सिंचनाच्या साहित्य निर्मितीपासून संगणकीकृत स्वयंचलित (ऑटोमेशन) यंत्रणेपर्यंत असंख्य विषयांवर कामे करणारे उद्योगधंदे स्वतः जळगावात राहून जगभर उभे केले. साहजिकच हे सगळे काम उभे करताना आधी त्यांना सर्व विषयांचा खोलात जाऊन अभ्यास करावा लागला. ते विषय तज्ज्ञांकडून समजून घ्यावे लागले. स्वतःला अगोदर विषय पूर्णपणे समजला तरच सहकाऱ्यांना तो साध्या-

सोप्या व सरळ भाषेत स्पष्टपणे समजून सांगता येतो आणि मगच त्यांच्याकडून आपल्याला पाहिजे असेल व अभिप्रेत असेल त्या पद्धतीने काम करून घेता येते. दुसऱ्यांकडून काम करून घेणे ही तितकीशी सहज व सोपी वाटावी अशी गोष्ट नाही. यासाठी नुसती कला म्हणजे व्यवस्थापन कौशल्य आणि एमबीए चे शिक्षण पुरेसे नसते. मूळ विषयाचा गाभा तुम्हाला अवगत झालेला असला पाहिजे आणि भक्कम वैचारिक पायावरती ध्येय वा अंतिम लक्ष्य उभे राहिलेले असले पाहिजे. मोठ्या भाऊंनी स्वतःची वैचारिक पायाभरणी अगोदर मजबुतीने उभी करून घेतली होती. त्यामुळेच ते कंपनीतील सहकाऱ्यांकडून त्यांना पाहिजे असलेल्या पद्धतीने काम पूर्ण करून घेऊ शकले. ही कामे पूर्णत्वाला नेण्यासाठी त्यांनी ज्या पद्धतीचा व तंत्राचा अवलंब केला त्याला भाऊंची गुरुकुल पद्धती असे नामाभिधान आम्ही केले आहे. सहकाऱ्यांना अगोदर कामातले सगळे बारकावे, खाचखळगे भाऊ समजून सांगत. अनेकदा काम करणारे सहकारी तरूण, वयाने लहान व अननुभवी असत. त्यांच्याशी त्यांच्या पातळीवर जाऊन संवाद साधणे ही फारशी सोपी गोष्ट नाही. मुलांशी संवाद साधताना मूल होऊनच शिकवावे लागते ही गोष्ट भाऊंना अचूक कळलेली होती. त्यामुळेच ते सहकाऱ्यांशी मालकाच्या, बॉसच्या भूमिकेत फारसे वावरले नाहीत. खऱ्या शिक्षकाला स्वातंत्र्याचे आंतरिक स्वरूप आकळलेले असते. म्हणून तो विद्यार्थ्यांना मदत करतो. तशी मदत भाऊंनी सहकाऱ्यांना करून हाडाच्या शिक्षकाचे दर्शन घडविले. अहंच्या साऱ्या प्रक्रिया समजून घेणे, त्यावर चिंतन करणे, हा आत्मज्ञानाचा मार्ग आहे हे अगोदरपासूनच जाणलेल्या भाऊंनी अहंकाराचा वारा आपल्या आजूबाजूला फिरकू दिला नाही. जे जे आपणांसी ठावे, ते ते इतरांसी सांगावे, या न्यायाने मुक्त व उदारहस्ते ते ज्ञान, अनुभव वाटत राहिले. यातून अनेकांची जीवने घडली.

आजचा समाज ज्ञानप्रधान आहे. आजही श्रद्धेतून अभ्यास होतो. करूणेची नवी-नवी रूपे आज व्यक्त होत आहेत. लहान मुलांना मनापासून शिकविणे हे करूणेचे रूप आहे. विद्यार्थ्यांना सल्ला देणे यात प्रौढ गुरुत्वाची करूणा आहे. सहकाऱ्यांना ज्ञान देण्यासाठी स्वतः अगोदर खोलात जाऊन अभ्यास करणे



**अशोक जैन**
अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

# अध्यक्षीय

हे ध्येयवादी हाडाच्या शिक्षकाचे लक्षण आहे. भाऊ अगदी तसे होते. विज्ञान आणि तंत्रज्ञानावर त्यांची प्रचंड श्रद्धा व निष्ठा होती. विज्ञानाने अनेकांच्या शोधातून मानवी जीवन सुखी केले आहे. माणसाला अंतरंगाचे भान कळल्याशिवाय तो जगू शकत नाही. त्याला सत्याचे भान येण्यासाठी संवादाची आणि स्वदेशीची गरज आहे हे जाणून मोठ्या भाऊंनी सहकाऱ्यांशी जो मनमोकळा त्यांच्या पातळीवर जाऊन संवाद केला ही नवीन व वेगळी शिक्षणपद्धती होती. म्हणूनच ती अनोखी व अनुकरणीय ठरली. आपला भार दुसऱ्यावर न टाकता तो आपण आपला उचलावा, समाजाला मदत करावी, जगण्यातल्या मूल्याचा हा अर्थ आहे हे अनेकदा भाषण, लेखन व संवादातून जाहीरपणाने सांगून भाऊंनी गुरुकुल शिक्षण पद्धतीने संकुचितपणा नाहीसा केला. कंपनीत सहकारी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीला स्वतंत्र केले, त्याच्या जगण्याला मूल्ये दिली. प्रयोगशाळा निर्माण केल्या तरी, समाज विकासाला ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या नेमकेपणाने ओळखून भाऊंनी त्या वापरात आणल्या. सेवाभावातून काही परोपकार केले तर ते काम श्रेष्ठ वाटते. लोकांना सुखी करण्याला फक्त ऐहिक गोष्टी लागतात असे नाही. त्या बरोबर त्यांना येणारे आत्मभान करूणेचे दर्शन घडविते. प्रतिभावंत असणारे भाऊ हे करूणेचे स्वतः मोठे पूजक होते. प्रतिभेचे बुद्धीशी वैर नाही. प्रतिभा म्हणजे बुद्धीचेअत्यंत शुद्ध व सूक्ष्म रूप हे ते जाणून होते. आत्मज्ञानाचे महत्वही त्यांनी ओळखलेले होते. त्यामुळे आपल्या गुरुकुल शिक्षण पद्धतीतून भाऊंनी सहकाऱ्यांमध्ये आत्मज्ञान वाढीला लावण्याचा प्रयत्न केला. त्यातून सहकाऱ्यांमध्येही व्यापक भान झाले. हे विश्वची माझे घर अशी भावना निर्माण झाली. त्यांच्या मनातील भीती, न्यूनगंड, अहंगंड, मानसिक आजार, विकृती हे सारे नाहीसे झाले. तो निर्भय बनला म्हणूनच अशक्य वाटणारी अवघड कामे सर्वांनी संघटितपणे खांद्याला खांदा लावून पूर्णत्वाला नेली. त्यामुळेच जगभर आमच्या जैन इरिगेशन कंपनीचा नावलौकिक झाला. ही सगळी कृपा मोठ्या भाऊंच्या कार्यकर्तृत्वाची आहे. जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीला सर्व सहकाऱ्यांच्या वतीने अंतःकरणपूर्वक नमस्कार.

# भवरलाल भाऊंचे गुरुकुल व शिक्षणपद्धती







**डॉ. सुधीर भोंगळे**
संपादक

# संपादकीय

राष्ट्राची आणि समाजाची प्रगती होऊन त्याची विकासाच्या दिशेने वाटचाल व्हायची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, याची पुरेपूर व अचूक जाण असलेल्या भवरलाल जैन यांनी, आयुष्यभर शिक्षणाचा ध्यास घेऊन स्वतःचे 'नवे गुरूकुल' निर्माण केले. शिक्षण हाच औद्योगिक प्रगतीचा आणि उद्योगधंद्यांच्या भरभराटीचा मूलभूत पाया आहे हे जाणलेल्या मोठे भाऊ उर्फ भवरलालजी यांनी शेवटच्या श्वासापर्यंत नवीन काही शिकण्याची व सतत संशोधनात रमून कार्यरत राहण्याची आस आणि उर्मी अखंडपणे बाळगली. इतकेच नव्हे तर आपल्या समवेत काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांमध्येही शिक्षण व संशोधनाची जिज्ञासा निर्माण करून त्यासाठीची व्याकुळता आपल्या गुरुकुल पद्धतीतून वाढीला लावली. वेदांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थी म्हणतो, 'चारही दिशा माझ्यासमोर नम्र होवोत'. प्राचीन काळापासून स्वाध्यायातून आणि प्रवचनातून श्रवणाची आणि संवादाची परंपरा भारतीय मनात अखंड राहिली आहे. आचार्य विनोबा भावे यांनी गुरुकुल पद्धतीचे एक महत्वाचे सूत्र सांगितले आहे, ते म्हणजे, "पुस्तकात शब्द असतात. अर्थ सृष्टीत असतो". हे जेव्हा कळेल तेव्हा 'पुनरुत्थान समरसता गुरुकुलमचा' अर्थ कळेल. केवळ शब्द घोकण्यात जर बुद्धी राहिली, तर ती अर्थहीन होते. भवरलालजींनी गुरुकुलासंबंधीच्या विचारांना आणखीन एक नवा शब्द व विचार जोडला तो प्रत्यक्ष कार्याचा व अंगमेहनतीचा. सहकाऱ्यांसमवेत स्वतः कामाच्या ठिकाणी उभे राहून त्यांना कार्यानुभवाचे शिक्षण देण्याचा जो वस्तुपाठ मोठ्या भाऊंनी निर्माण केला तेच त्यांच्या गुरुकुलाचे एक वेगळे वैशिष्ट्य होते. पूर्वीच्या गुरुकुल पद्धतीत शिष्यांना



*गुजरातचे तत्कालीन कृषीमंत्री भुपेंद्रसिंह चुडासमा यांना उत्पादन प्रकल्प दाखवितांना मोठेभाऊ सोबत अतुल जैन*

शिक्षण दिल्यानंतर कामाची आज्ञा देण्याची पद्धत होती. भाऊंच्या गुरुकुलामध्ये त्यांनी सहकाऱ्यांना शिक्षण, प्रशिक्षण, सहवास व आधार देत कामातली एकाग्रता कशी वाढीला लावून तळमळला जीव माझा सर्वोत्तमासाठी अशी अवस्था निर्माण केली. त्यातून सहकाऱ्यांचे मन चैत्रपालवीसारखे फुलले आणि उत्कृष्ट व सर्जनशील कामांच्या असंख्य गुढ्या उभ्या राहिल्या. आजही अनेकांना असा प्रश्न पडतो की एका आयुष्यात (लाभलेल्या ७९ वर्षात) एवढी सगळी डोंगराएवढी कामे भवरलालजींनी पूर्ण कशी केली. याचे रहस्य काय आहे? या रहस्याची अनेक अंगउपांगे आहेत. त्यातल्या एका म्हणजे 'भाऊंची गुरुकुल पद्धती भूमिका आणि कार्यान्वितता' या अंगाला स्पर्श करण्याचा प्रयत्न त्यांच्या जयंतीनिमित्त (१२ डिसेंबर) लिहित असलेल्या या संपादकीय मधून करण्याचा प्रयत्न आहे. मोठे भाऊ मलाही पूर्ण कळले होते असा माझा दावा नाही. पण १९८७ ते २०१६ या २९-३० वर्षांच्या काळात त्यांचा जो सहवास व विचारधन मला लाभले त्याच्या आधारे लेखनाची ही वटवट केलेली आहे.

### हवाहवासा वाटणारा भाऊंचा सहवास

सहवास म्हणजे सोबत किंवा बरोबरीने राहणे, असा काहीसा वरवरचा अर्थ आपण नेहमी विचारात घेतो. एखाद्याच्या जवळ राहिलो किंवा काही वर्षे त्यांच्या समवेत वावरलो म्हणजे सहवास होत नाही. सहवास या शब्दात 'सह' तत्वाला प्राधान्य आहे. सह म्हणजे सहित किंवा उचित वा योग्य. सहभावसुद्धा. हा भाव सर्वात अवघड आहे. माझे माझ्यावर जितके प्रेम तितके माझ्या संगतीत असणाऱ्यावर हवे. प्रेम स्वार्थीपणातून वा असुरक्षिततेतून येत असेल तर तो सहभाव होईल? प्रीती जर स्वामित्वातून निर्माण होत असेल तर तो सहवास ठरेल? प्रेम असुरक्षिततेपोटी जन्माला येऊन जर जगणेच भयावह करीत असेल, तर तो सहवास 'सहवास' होईल? भाऊंचा सहवास हा सुखद आणि प्रेमाचा होता. तो रोज नवे काही शिकविणारा होता आणि चुकलोच तर फटकारणाराही होता. पण त्या शब्दअसूडाचे वळ अंगावर उठणारे नव्हते. ते योग्य मार्गाला लावणारे होते. त्यामुळे भवरलालजींचा सहवास सगळ्यांना सतत हवाहवासा वाटे. त्यांचा सहवास म्हणजे सुजाण मनाच्या समंजसपणाचा प्रसाद होता. मोठ्या भाऊंचा सहवास म्हणजे मनाने मनाला दिलेली एकत्वाची साद होती असा अनुभव माझ्यासह अनेकांना आला आहे. सहवास म्हणजे जगण्याच्या सातत्याचे उच्च संवेदनरूप. सहवास म्हणजे जगण्याच्या अधिष्ठानावरील मानवत्वातील देवपूजा. अशी मानसपूजा भाऊ हयात असतांना आणि आज हयात नसतांनाही आम्ही निरंतरपणे करीत आहोत हे सहवासाचे

अतिउत्कट, प्रेमदायी व चिरंतन रूप आहे. त्यातून जी चिरंजीव स्पंदने व्यक्त होतात तो सहवास आहे. या सहवासाच्या रोज असंख्य आठवणी निघतात. आठवणी सांगण्यासाठी त्यांचा प्रत्येक सहकारी अहमहमिकेने पुढे सरसावतो आणि त्यावेळी 'भाऊ असे म्हणाले होते,' असे उत्साहाने छाती फुगवून जेव्हां सांगतो तेव्हा त्या सहवासाचे सोने झाले आणि भाऊ शरीराने नसले तरी मन व विचाराने अजूनही आपल्यातच आहेत याचा साक्षात्कार घडतो. त्यामुळेच भाऊंचे गुरुकुल परिपूर्ण आणि चिरंतन असून ते आपल्या सर्वांना एखाद्या दीपस्तंभासारखे अखंड व अविरत मार्गदर्शन करीत राहणार आहे.

भवरलालजींच्या सहवासातून मिळालेले शिक्षण व कार्यप्रेरणा ही अनुभवाची अखंड ज्ञान प्रक्रिया आहे. ती संख्येत मोजण्यापेक्षा गुणांत मोजावी. गुणात्मकता चिरंजीव असते. संख्यात्मकतेला अंतिमपण आहे. सहवास गुणात्मकतेच्या रूपात अखंड वास करतो. यासाठी देहाचा सहवास लागतोच असे नाही. देह आज आहे, उद्या नाही. परंतु देहातून निर्माण झालेली गुणप्रक्रिया सातत्याने पुढे जाते. सहवासातला गुणात्मक भाव मुरला, की सहवासाचा खरा अनुभव योतो. भाऊंच्या सहवासात आलेले न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, शरद पवार, अप्पासाहेब पवार, कवी ना.धों. महानोर, डॉ. भालचंद्र नेमाडे, डॉ. अनिल काकोडकर, श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्यासारखे असंख्य लोक या सहवासातल्या गुणभावांबद्दल नेमकेपणाने जे बोलले आहेत ते आपण लक्षात घेतले तर भाऊंच्या गुरुकुल पद्धतीच्या काही अंगांची व वैशिष्ट्यांची आपल्यालाही उकल होऊ शकेल.

कृष्णाला राधेचा सहवास किती काळ होता? पण अध्यात्मवृत्तीत राधा मुळापासून मुरली. तिने मुरलीची धून आजन्म अंगी लावून घेतली. इतकी, की 'राधा-कृष्ण' हा ब्रह्मसमास झाला. तो काळालाही तोडता आला नाही. सीतेने विदेहीपणा जो सांभाळला तो रामात समर्पित केला नि 'सीता-राम' हा मूलमंत्र झाला. भीष्मांनी शरपंजरी फक्त विष्णुसहस्त्रनाम घेतले. भगवंताचा सहवास होताच, पण सहवासाचे अंतिम मूल्य गुणात्मकतेत असते. तसे भवरलाल म्हटले की जैन इरिगेशन हे नाव आपोआप जुळते. मग या कुळातले सगळे निष्ठावंत सहकारी मनोभावे हात जोडून एका रांगेत उभे राहतात. याला सहवास


आप्पासाहेब पवार (बारामती), ना.धों. महानोर यांचेशी ठिबक सिंचन आराखड्याची चर्चा करताना भवरलाल जैन

म्हणतात. यातून माणूस आणि विश्व यांचा संवाद घडतो. हाही सहवासाचाच एक भाग असतो. सहवासाला तप लागते. अभ्यास लागतो. अवघ्या जगातले मीत असल्याची जाणीव यावी लागते. तेव्हा कुठे जगायला प्रारंभ होतो. याचा बोध भवरलाल भाऊंच्या गुरुकुलातूनच मिळतो. इतरांना तो सहजा सहजी लक्षात येणार नाही आणि त्याचे आकलनही होणार नाही. त्यासाठी गुरुकुल पद्धती महत्वाची आहे.

उपनिषदात एक सुंदर रुपक कथा आहे. एक विद्यार्थी गायी चारीत चारीत शिक्षण मिळवितो. या प्रक्रियेत कधी त्याला एखादा बैल ज्ञान देतो. कधी एखादी चिमणी ज्ञान देते. कधी एखादा वृक्ष वेगळे ज्ञान देतो. असे ज्ञान मिळाल्यामुळे तो सतेज होतो. यावर गुरु त्याला विचारतात, बाळा , तुला ज्ञान मिळाले आता. यावर तो म्हणतो, गुरुमुखाशिवाय ज्ञान कसे? गुरू सांगतात, तुला खरोखर ज्ञान प्राप्त झाले आहे. तुझी विद्या निर्मल आहे. याचा अर्थ शिष्य आणि गुरू दोघेही एकमेकांच्या आचरणातून शिकतात. दोघेही आजन्म विद्यार्थी असतात. धडे दिले जात नाहीत तेच शिक्षण असते. जे घेतले असताना व्यक्तित्व उमलते ते शिक्षण असते. म्हणून गुरुकुलाची मोजदाद करता येत नाही. जीवनातून शिक्षण घ्यायचे असते. मोठ्या भाऊंनी असे शिक्षण आपल्या सर्व सहकाऱ्यांना दिले.

**पहाटेपासून ज्ञानदानाला प्रारंभ**

पहाटे उठून जेव्हा ते फिरायला घराच्या बाहेर पडत तेव्हा टाकलेल्या पहिल्या पाऊलापासून ज्ञानदान आणि अनुभवाच्या देवाणघेवाणीला सुरूवात होत असे. जळगावातील जैन हिल्सच्या टॉवरवर जेव्हा ते नाश्त्याला बसत तेव्हा चर्चेला उधाण आलेले असे आणि अनुभवाचे सार समुद्रातील शिंपल्यांमधून कसदार अस्सल मोती बाहेर पडावेत तसे भाऊंचे शब्द बाहेर पडत असत. ही अनुभव व शब्दांची उधळण ज्याने अनुभवली आहे त्यांना भाऊंच्या गुरुकुलातली रंगपंचमी कशी बहारदार, नेटकी आणि जीवनात चैतन्य ओतणारी होती हे निराळे सांगण्याची गरज नाही. गुरुकुलातील शिक्षकाला वेदात 'गातुवित्' म्हणजे मार्ग शोधून काढणारा (पाथ-फाइन्डर) असे म्हटले आहे. गुरू हा समर्थ मार्गदर्शक आहे. तो शिष्याला ज्ञानरूपाने नव्या जन्माला घालतो. त्याला 'शाचिष्ठ' म्हणजे 'शशक्तिशाली' म्हटले आहे. तो नुसता ज्ञानात प्रवीण नको. त्याला सृष्टिज्ञान अवगत पाहिजे. जीवनातील विविध अनुभवांना समर्थ मनाने सामोरी जाणारी जी विवेकनिष्ठ जाणीव असते तिला गुरूकुलातले शिक्षण म्हणतात. असे शिक्षण मोठ्या भाऊंनी जैन इरिगेशन कंपनीतल्या सगळ्या सहकाऱ्यांना



*जैन हिल्स येथे प्रभात फेरी वेळी नातवंडासोबत मोठेभाऊ सोबत डॉ. अनिल पाटील, डॉ. दोशी, पी. व्ही. चौगुले, डॉ. अनिल ढाके व सहकारी*


जैन व्हॅली येथे फ्रुट प्रक्रिया प्रकल्पात नैसर्गिक सुर्यप्रकाश कसा वापरायचा यावर सुनील देशपांडे, व्ही.पी.पाटील यांचेशी चर्चा करताना भाऊ

# आत्मज्ञान सांगणे हाच भाऊंचा बोध

सहकाऱ्यांकडून काम करून घेण्याची भाऊंची स्वतःची एक शैली होती. ती अभ्यास, अनुभव व निरीक्षणातून पक्व झालेली होती. त्यामुळे ते बोलत असलेले शब्द अचूक, मार्मिक, विषयाला धरून व कोंदणात बसविल्यासारखे असत. त्याला आम्ही 'भाऊंचा बोध' असे म्हणत असू. बोध म्हणजे नक्की काय? तर ते आपलेपणाने आत्मज्ञान सांगत असत. कामाची पूर्तता हे निमित्त असे. पण ते शेवटाला कसे न्यायचे याची दिशा दाखविताना भाऊ सहकाऱ्यांना आत्मज्ञानाने दृष्टीपूत करीत असत. त्याने कसे वागावे हे सांगत. त्याच्या अधिकाराची जाणीव करून देत. अधिकार आणि कर्तव्ये जेव्हा हातात हात घालून चालतात, तेव्हा काम निश्चित परिपूर्णतेच्या दिशेने व उत्कृष्टरितीने मार्गी लागते. सहकाऱ्यांनी नेमके काय व कसे काम करावे हे भाऊंनी निःसंदिग्धपणे सांगितल्यामुळे कामात संदिग्धता राहून गोंधळ उडत नसे. भाऊ नेहमी म्हणायचे, “पावलातले तळवे ज्याला वाचता येतात तोच मातीशी इमान राखतो. अन्यथा गर्दी आणि गोंधळाचे मन नसलेले मानसशास्त्र सैरावैरा भटकते. त्यामुळे जगण्याला मूल्य प्राप्त होत नाही”. भाऊंचे हे बोल जगण्याचे मोल सांगत असत. जगण्याचे मोल पैशात नाही. ते स्वतःच्या श्रमात आहे. श्रमाची किंमत कधीही होत नसते. श्रमाची कृतज्ञता हे श्रमाचे काहीसे मूल्य होऊ शकते. माणसाने माणूस जोडला पाहिजे. माणूस कळण्यासाठी माणूसपणा मुळात असला पाहिजे हाच या बोधाचा गर्भितार्थ आहे.



जैन हिल्स येथे ट्रॅक्टर रोटावेटरची माहिती जाणून घेताना मोठेभाऊ

तर दिलेच पण त्यांना भेटायला येणाऱ्या, सल्ला मागणाऱ्या वाटसरूंनाही दिले. हातचे काहीही राखून न ठेवता उदार हस्ते भरभरून देण्याची जी दानशूरवृत्ती भाऊंच्या रोमारोमात भरली होती त्यामुळे त्यांना भेटणारा प्रत्येक माणूस रिकाम्या हाताने कधीच गेला नाही. काही नाही तर दोन नवीन विचार व प्रेमाचा हितकारी सल्ला त्याच्या झोळीत पडलेलाच असणार असे या गुरुकुलाचे वैभव आहे, होते आणि तीच परंपरा त्यांची चारही मुले आज समर्थपणाने पुढे चालवित आहेत ही या गुरुकुलाची अनोखी ओळख व श्रीमंती आहे.

## जैन इरिगेशन एक आदर्श गुरूकुल

जैन इरिगेशन ही एक निव्वळ कंपनी नसून राष्ट्रविकासासाठी लागणारी उत्तुंग व्यक्तिमत्वे घडविणारे एक आदर्श गुरुकुल आहे. भवरलालजी जैन हे या गुरुकुलाचे आचार्य होते. आचार्य म्हणजे 'आचारसंपन्न'. स्वतः आदर्श जीवन जगून राष्ट्राकडून ते आचरवून घेणारा तो आचार्य. सर्व शास्त्रांचे ज्ञान मिळवून जो आपल्या विद्यार्थ्यांना, सहकाऱ्यांना देतो आणि त्या ज्ञानाला अनुसरून जो स्वतःचे वर्तन करतो त्याला आचार्य म्हणतात. अशा आचार्यांनी राष्ट्र निर्माण केले आहे. या आचार्यांनी राष्ट्रीय शिक्षणाला दोन शक्ती दिल्या. पहिली शक्ती 'स्वाहा' आणि दुसरी शक्ती 'स्वधा'. स्वाहा म्हणजे 'आत्मार्पण'. स्वधा म्हणजे 'आत्मत्याग'. यातून गुरूकुलातील शिक्षणाचे तीन विभाग पडले. १) निसर्ग शिक्षण २) व्यक्ती शिक्षण ३) व्यवहार-शिक्षण.

निसर्ग शिक्षण म्हणजे, शरीर निरोगी ठेवणे. बौद्धिक शक्ती प्रगल्भ करणे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आत्मिक विकास हे निसर्ग शिक्षणाचे चार पुरूषार्थ आहेत. या निसर्ग शिक्षणासाठी भाऊंनी जळगावच्या जैन हिल्सवर मोठ्या प्रयत्नांनी, प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीवर मात करीत स्वतःचा सुंदर निसर्ग उभा केला. झाडे, झुडपे, लता, वेली, कीडे, मुंग्या, पशू पक्ष्यांसह सर्वांना सुखाने व एकजीवाने नांदता यावे अशी व्यवस्था जैन हिल्सवर करून दिली. पहाटेच्या वेळी फिरायला जाताना पाने, फुले, वनस्पती, झाडे, फांद्या यांच्याशी सुसंवाद साधून व त्यांच्या भावभावना आणि संवेदना समजून घेत भाऊंनी त्यांना हवा तसा निसर्ग उभा करून दिला. त्यामुळे जैन हिल्सला नैसर्गिक अप्रतिम देखणेपण तर लाभलेच पण कधी एकदा ते पाहण्यासाठी मी जातो अशी आस निसर्गाची ओढ व निसर्गावर प्रेम असणाऱ्या

प्रत्येक माणसाला लागली. परिणामी जगातली अनेक माणसे या जैन हिल्सवर रमली आणि वारंवार वास्तव्यास येऊ लागली. खरे तर आस म्हणजे इच्छा हा या शब्दाचा कोशातला अर्थ झाला. इच्छा वरवरची असते, पण इच्छेतून जी जाणिवेची खोली निर्माण होते, त्याला आस म्हणतात. आस मनाच्या चिंतनगर्भ जाणिवेतून प्रकटते. ती प्रकटली की आपल्या प्रगतीचा आलेख झेपावतो. आस खच्चून अंर्तबाह्य भरलेली व्यक्तीच आपले स्वतःचे आभाळ निर्माण करू शकते. समाजाला, राष्ट्राला आणि त्यातही शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उपयोगी पडेल असे भव्यदिव्य काही उभे करण्याची आस मोठ्या भाऊंच्या अंतःकरणात ठासून भरलेली होती त्यामुळेच ते अल्पावधीत दैदिप्यमान काम करू शकले. इच्छा हा कामासाठी तात्पुरता उतारा असतो. आस जगण्याच्या कायमपणाला बळ देते. आस मनाच्या कुपीत राहते. इच्छा तात्पुरती असते. आस असामान्य असते. जैन हिल्सला भेट दिल्यावर सामान्य - असामान्य यातला फरक कळतो. आस ही अखंड चालणारी आंतरप्रक्रिया आहे. अलौकिक मोठी माणसे ती प्राणापलीकडे जपतात. तशी भवरलाल भाऊंची आस होती. म्हणूनच ते जगाच्या कल्याणाकरिता सतत धडपडत राहिले. समाजावर कृपेचा वर्षाव करीत राहिले. भाऊंच्या या आसेतून जनकल्याणासाठी निर्माण झालेल्या दृष्टीतून शेतकऱ्यांना नवीन ज्ञान, विज्ञान, संशोधन, तंत्रज्ञान याचे पसायदान लाभले.

## भाऊंचा आग्रह सहज शिक्षणाचा

व्यक्ति-शिक्षणात व्यक्तीच्या प्रकृतीनुसार त्याला ज्ञान देण्याच्या कक्षा देऊन निसर्गाचा सहचर बनविणे. व्यवहार-शिक्षणात समाजव्यवहाराचे भान राखून शिक्षणाच्या विविध शाखा अभ्यासून दिले जाणारे शिक्षण. मात्र या तीनही शिक्षणात सहज शिक्षण मिळाले पाहिजे ही भाऊंची भूमिका व आग्रह होता. प्रश्नोत्तरात सहज शिक्षण नसते. ज्यातून अंतरीचें धावें स्वभावें बाहेरीं अशा रीतीने जे स्वयम् अभिव्यक्त होते ते शिक्षण असते. असंच शिक्षण भाऊंनी सहकाऱ्यांना दिले. अशा ठिकाणी गुरू हा दिवा असतो. सहजतेतून विद्या आत्मसात कशी करता येईल हे तो सांगतो. यातून सहज शिक्षण जन्मते. भाऊंच्या गुरुकुलातून असेच शिक्षण आम्हा सर्व सहकाऱ्यांना मिळाले आहे. आचार्य विनोबा भावे यांनी एक अप्रतिम दृष्टांत या संदर्भात दिला आहे. श्रीकृष्णांनी समाजाला नवा कर्मयोग शिकविला. याला प्राचीन आधार होता. त्यांनी त्यातून नवीनता दिली. पूर्वी तूप, गुळ, कणीक होती. पण त्यांनी त्यांचा लाडू केला. तो गोपाळांना दिला. एका विशिष्ट विचारातून असे सहजपण जन्माला येऊ शकते. त्याकाळी गुरुकुलातील अध्ययनाला पर्याय नव्हता. मध्यंतरीच्या काळात म्हणजे हजारो वर्षे ही परंपरा खंडीत झाली. सांदिपनी ऋषींच्या आश्रमातील गुरुकुल भगवान श्रीकृष्णांनी अनुभविले. गुरूसेवेने तृप्त झालेल्या सांदिपनींनी श्रीकृष्णाला काही


जैन हिल्स येथे सहकाऱ्यांसमवेत माहिती जाणून मार्गदर्शन करताना भाऊ




# भाऊंचा धर्म - प्रयोग प्रमाणता

सतत विचारमग्न असणारे भवरलाल भाऊ काही ना काही शोधत असायचे. आपल्या शोधांमधूनच ते प्रयोगशील झाले होते. प्रत्येकाचे आयुष्य प्रयोगशील असते. जगण्याची प्रत्येकाची प्रयोगशाळा वेगळी असते. मोठ्या भाऊंचेही नेमके तसेच होते. अनेक विषयांची संशोधने एकाच वेळी त्यांच्या मनात रुंजी घालित असत. त्यांचा खरा पिंड शास्त्रज्ञाचाच होता. त्यामुळे ते सतत संशोधनात निमग्न असत. आपल्या निरीक्षणातील काही गृहीते ते अभ्यासातून तपासत. अभ्यासातून काही महत्वाचे निष्कर्ष हाती लागले की ते कसोशीने मननाच्या कसोटीवर तपासत असत. हे सारे काम ते वस्तुनिष्ठतेने करीत. जीवनात वस्तुनिष्ठते बरोबर आत्मनिष्ठाही लागते. त्यामुळे जगायच्या विकासकक्षा वाढतात. जगण्याचे शरीरभान विज्ञान देते, नि आत्मिक विकासाचे भान विद्या व कला देतात. जगण्याच्या अनुभवातली घनता प्रयोगातून येते याची पूर्ण जाणीव असल्यामुळेच प्रयोगप्रमाणता हा भाऊंचा धर्म बनला होता. हा धर्म स्वतःच्या आणि सहकाऱ्यांच्या जीवनावर सतत नवनवीन प्रयोग करायचा नि समाजाला अज्ञानातून सोडवायचा. जाणिवांना सजग करायचा.

प्रयोग या शब्दात 'प्र' हा उपसर्ग आहे. 'योग' मध्ये 'युज्' हा धातू आहे. 'युज्' म्हणजे जोडणे. जो समाज आणि अभ्यास यांना जोडतो, तो प्रयोग. यालाच अध्यात्मात प्रवृत्ती आणि निवृत्ती यांना जोडणे म्हणजे योग होय असे म्हणतात. जो सहज जुळतो तो योग. भवरलाल भाऊंच्या गुरुकुलामध्ये शिकण्याचे सदभाग्य आम्हांला लाभले हा आमच्या नशिबातला मोठा योग आहे एवढेच आम्ही म्हणून स्वतःला धन्य झालो असे म्हणू शकतो?

मागायला सांगितले. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, मातृहस्तेन भोजनम् ।। याचा अर्थ, आईच्या वात्सल्यातून जसे मूल वाढते, तसे श्रीगुरू माऊली रूपाने जे ज्ञान देतात त्यातून सहज व्यक्तित्व घडते. म्हणून मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे. मोठ्या भाऊंनी हे सूत्र तंतोतंत पाळले. उद्योगातले कितीतरी विषय तांत्रिक व अवघड होते. त्यांच्यासाठी मराठी शब्द शोधणे हे मोठे कठीण काम होते. भाऊंनी असंख्य शब्दकोश व डीक्शनरी पालथ्या घालून मराठी शब्द शोधून काढले आणि ते कोंदणात बसतील अशा पद्धतीने वापरून विषय सोप्या मराठी भाषेत सहकाऱ्यांना समजावून सांगून तो त्यांच्या गळी उतरविला.

## नैतिकता हा भाऊंच्या गुरूकृपाचा पाया

भाऊंच्या गुरुकुलाची एक वेगळी शिस्त व आचारसंहिता होती. ती सर्वांना पाळावीच लागे. शिस्त मोडणाऱ्यांना शब्दाचा भरपूर मार बसत असे. मी आणि अभय सारख्या खोडकरांनी हा मार पुष्कळदा खाल्लेला आहे. आमच्यामुळे हा मार एकदा अजितभाऊंनाही बसला होता. पण तो प्रसंग आता विस्तार भयास्तव येथे सांगत नाही. तथापि भाऊंच्या गुरुकुलातील अलिखीत आज्ञांची विभागणी करावयाची झाल्यास ती पुढील चार प्रकारे करता येईल. त्या अशा -

**१) सत्य च स्वाध्याय - प्रवचने च ।**
सत्याचे पालन आणि अध्ययन - अध्यापन केले पाहिजे.

**२) शमश्च स्वाध्याय - प्रवचने च ।**
शांती व मनःसंयम ठेवून अध्ययन-अध्यापन केले पाहिजे.

**३) दमश्च स्वाध्याय - प्रवचने च ।**
इंद्रिय दमन करून अध्ययन - अध्यापन केले पाहिजे.

**४) अतिश्यश्च स्वाध्याय - प्रवचने च ।**
अतिथीसेवा करून अध्ययन - अध्यापन केले पाहिजे.

ही चार सूत्रे शिक्षणाचे चार आश्रम आहेत. यातून 'स्वात्मभान' साधण्यासाठी विद्यार्थी (येथे सहकारी) आपल्याला आवडेल ते काम करू शकतो. भाऊ सहकाऱ्यांची गुणांची नस अचूक ओळखून होते. कुणाचा स्वभाव कसा आहे, काम करण्याची पद्धत काय आहे, त्याला आवड कशाची आहे, त्याच्या बुद्धीची पातळी काय आहे, विषय आकलन क्षमता काय आहे, अंगमेहनत करण्याची तयारी कितपत आहे, वेळेचे भान किती आहे, सहकाऱ्यांशी त्याचा संवाद कसा व कुठपर्यंत होऊ शकतो, संघटितपणे काम करायला तो समर्थ आहे की नाही याची तपासणी मनोमन झाल्यानंतरच भाऊ त्याला कामाची कोणती जबाबदारी द्यायची हे ठरवित असत. ते काम त्याच्या हाती सुपूर्त करण्यापूर्वी त्याला कामातले बारकावे, ते पूर्णत्वाला नेण्याची पद्धती व दिशा समजावून सांगत. कामात अचूकता हवी. गुणवत्ता हवी. वक्तशीरपणा हवा याबाबत ते काटेकोर होते. नैतिकता हा त्यांच्या सगळ्या कामाचा पाया होता. अनैतिक अशी गोष्ट त्यांनी कधी खपवून घेतली नाही आणि सहकाऱ्यांना करूनही दिली नाही. प्रसंगी नुकसान झाले तरी ते सोसण्याची त्यांनी तयारी ठेवली पण आपल्या सत्य व परखड विचारांशी त्यांनी कधी तडजोड केली नाही आणि त्यांची मोडतोडही होऊ दिली नाही. त्यामुळे त्यांच्या गुरुकुल परंपरेला कधी तडे गेले नाहीत. ती शाश्वत व आबादित राहिली.


*आर. स्वामिनाथन यांचे सोबत स्वयंचलित ठिबक सिंचन निर्मिती बद्दल चर्चा करतांना भाऊ*

### शिक्षणाचे तीन मुख्य विषय

भाऊंच्या गुरुकुलात शिक्षणासाठी तीन मुख्य विषय अभ्यासात होते. ते म्हणजे योग, उद्योग आणि सहयोग. योग म्हणजे स्थितप्रज्ञता. मनावर संयम ठेवणे. वाणी नेमकी व्यक्त करणे याला योग म्हणतात. आजच्या वर्तमानकाळात आणि भाऊंच्या गुरुकुलात हे काटेकोरपणे पाळले जात होते. मोजके बोललेले भाऊंना आवडत असे. पाल्हाळीक, विनाकारण, अर्थहीन व फाफट पसारा मांडणारे बोलणे करणाऱ्यांना ते जागेवर रोखत असत. आयुष्यातला वेळ, काळ फार महत्वाचा आहे. त्याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे मोजके व थोडक्यात बोलणे त्यांना आवडत असे. आपल्या आयुष्याला प्रत्येक क्षण न क्षण सत्कारणी लागला पाहिजे हा त्यांचा स्वभाव बनला होता. त्यामुळे पहाटे उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतचे वेळापत्रक त्यांनी पक्के केलेले होते. स्वभाव म्हणजे 'स्व'चा भाव ओळखणे. मुळात 'स्व' ओळखणे अत्यंत अवघड. 'स्व'लाच बऱ्याचदा 'स्व' समजत नाही म्हणून कधी कधी आपणही आपल्या मनाशी म्हणतो ना," अरे हे मी काय केले? "स्व' ओळखायला जो विशुद्ध भाव लागतो, त्यातून स्वभाव घडतो. स्वतःतल्या भावाची विचारपूर्वक जाणीव म्हणजे स्वभाव - ज्या संबंधितांतून अस्तित्वाला अर्थ देण्यासाठी मी धडपडतोय, त्याला स्वभाव म्हणतात. म्हणजे स्वभावातला 'स्व' जेव्हा व्यापक होतो, तेव्हा स्वभावाला व्यक्तिमत्व प्राप्त होते. 'स्व' ची यथार्थ जाणीव आयुष्याच्या मुशीतून परिपक्व असा सुगंध होऊन येते, त्याला स्वभाव म्हणतात. भाऊंच्या स्वभावामध्ये अपार प्रेम, करुणा, दया, ओलावा आणि अडचणीत सापडलेल्या माणसाला मदतीचा व आधाराचा हात देण्याची आस ओतप्रोत भरलेली होती. आपल्या गुरुकुलाशी संबंधित असणाऱ्या आणि नसणाऱ्याही हजारो लोकांना, सहकाऱ्यांना भाऊंनी कायमचा मदतीचा आधार दिला आहे.

### भाऊंच्या मायेचा सहकाऱ्यांना आधार



*पायाला अपघात झालेल्या सहकाऱ्याची आस्थेवाईकपणे विचारपूस करताना मोठेभाऊसोबत अतुल जैन, जे.एस. जैन, दिलीप सांखला व इतर*

जगण्याची पृष्ठभूमी म्हणजे आधार. वाटचालीला चैतन्याचा गाभा तेवत ठेवणे म्हणजे आधार. आधारात पांगुळगाडा नसतो. अंधारात मदतीचा हातही अपेक्षित नाही. यातले सहाय्य हे निमित्त असते, परंतु ज्याच्या जीवनाची धार आसमंत होऊन कर्तृत्वाची घराणी निर्माण करते, तो खरा आधार असतो. माणसाला नेहमीच कुणाचा ना कुणाचा आधार लागतो. आधार नसला तर तो निराधार होतो. कवी ना. धों. महानोर, डॉ. भालचंद्र नेमाडे, सी.के. मेहता यांच्यासारख्या असंख्य मित्रांना भाऊंचा मायेचा आधार वाटत असे. अर्थात आधार द्यायलाही मन मोठे लागते. ज्याला आधार द्यायचा तोही मोठा असावा लागतो. मोठा म्हणजे उदार. पृथ्वीला

आभाळाचा आधार असतो. काठाना दिशांचा आधार असतो. तो जाणिवांच्या मन:कोषात असतो. मनाची एक निःशंक विश्रांतीची जागा म्हणजे आधार. असा आधार मनाला उभारी देतो. धीर देतो. असा आधार भाऊंनी कंपनीतल्या सहकाऱ्यांना दिल्यामुळे कितीतरी अशक्य व अवघड वाटणारी कामे सहकाऱ्यांनी कमी वेळेत, कमी खर्चात चुटकीसरशी पूर्ण केली. भाऊंनी जो आधार आणि आत्मविश्वास त्यावेळी दिला त्यातून पाऊलखुणांचे उमटलेले ठसे मागाहून येणाऱ्यांसाठी सोनखुण बनले. आजही या सोनखुणांचे ऐश्वर्य कंपनीतल्या सर्व सहकाऱ्यांना नेटाने व वेगाने काम कसे पुढे न्यावे हे शिकवित असतात.

होता. कठोपनिषदात विज्ञान हा मनाचा सारथी आहे असे म्हटले आहे. विज्ञान इंद्रियांच्या साहाय्याने गृहीतत्वाचा शोध घेते. हा शोध स्थिर मनाने घेतला, तर संसार विष्णुपदासाठी प्राप्त होतो असे कठोपनिषदात सांगितले आहे. विज्ञान मननातून वाढते. 'इंद्रियांना समज आणते. सामाजिक भानाचे आणि नैसर्गिक पर्यावरणांचे सूक्ष्म अवलोकन करते. मनाची सोबत घेते. कामात मन ओतते तेंव्हाच कामे पूर्णत्वाला जातात. भाऊंनी ठिबक सिंचन साहित्याची निर्मिती, पीव्हीसी व एचडीपीई पाईपांची निर्मिती, टिश्यू कल्चर तंत्रज्ञानाचा वापर करून केलेली केळी, मोसंबी, स्ट्रॉबेरी व अन्य रोपांची निर्मिती, कांदा निर्जलीकरणाचा



*प्लास्टिक पार्क येथे हसमुखभाई शाह यांच्या भेटीप्रसंगी मोठेभाऊ सोबत डॉ. वैद्यनाथन, आर.बी. जैन व इतर सहकारी*

गुरुकुल शिक्षणातला दुसरा विषय म्हणजे उद्योग. उद्योग म्हणजे निरपेक्ष कर्मयोग. जे काम मला करावयाचे आहे, ते मनापासून करायचे. भोवतालच्या निसर्गाला सांभाळून करायचे. निसर्गाची जर आपण मोडतोड व विध्वंस केला तर राष्ट्र दुर्बल होईल. शिक्षण हतबल होईल. जो-तो पोटभरू शिक्षणासाठी पळत सुटला म्हणून सगळ्यांनी मिळून जे एकत्र काम करायचे तो उद्योग होय. भाऊ तर दिवसरात्र उद्योगात रमणारे होते. शेतकऱ्यांचे कल्याण, त्यांच्यासाठी नवीन तंत्रज्ञान व अवजारांचा शोध आणि विकास याचकरिता त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले. या सगळ्या उद्योगांचा आधार विज्ञान हा

उभा केलेला प्रकल्प व यांसारखे असंख्य उद्योग ही विज्ञान साधनेला आलेली फळे आहेत. या विज्ञानाची जेव्हा मननाच्या खोल जाणिवेतून आत्मज्ञानाशी निरपेक्ष गाठ मारली जाते तेव्हा जाणिवेत समत्व निर्माण होते. विज्ञान परोपकारी ठरते. ते माणूसपणाला जपते. अधिकाराचा योग्य वापर करते. आत्म्याला समजावून घेते. कुठल्याही विषयाचा अभ्यास असो. अभ्यासू मन महत्वाचे असते. ते जर असेल तर चांगले आणि वाईट याचे नीट आकलन होते. इंद्रियांपेक्षा विषय श्रेष्ठ आहे. विषयांपेक्षा मन श्रेष्ठ आहे. मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ आहे. बुद्धीपेक्षा आत्मा श्रेष्ठ आहे विषयातील आशय मनाला नीट समजावा म्हणून इंद्रिये

निर्माण झाली. त्यांनी सृष्टीतले कुतुहल जाणून घेतले. सृष्टी - पालिकडचे जे आहे, ते मनाने कल्पिले. मनाने अभ्यासले. हा मनाचा विज्ञानाकडून आत्मज्ञानाकडे होणारा प्रवास विवेकशील आहे. विचारयुक्त बुद्धी येथे उपयोगी पडते. बुद्धी मनाला ताब्यात ठेवते. आत्मा मनाला सांभाळतो. भाऊंच्या गुरुकुलाने उद्योगातून हे निरपेक्ष कर्मयोगाचे शिक्षण सहकाऱ्यांना दिले. भाऊ कायम सांगायचे "आपण जे काही काम करतो ते विश्वात्मक देवाला अर्पण करावे. कर्म परमेश्वराला अर्पण केले की परिपूर्ण होते. "कर्म कोणतेही असो. बऱ्या-वाईट कर्माच्या ठिकाणी मनच असते. म्हणून मनाला सतत जपायचे, विवेकी ठेवायचे. म्हणजे ते वाईट होत नाही. पाप-पुण्याच्या युद्धात सापडत नाही. मनाच्या धारणा पक्क्या राहतात. बुद्धीची झेप अनंताच्या शोधात सतत वावरते. यातून विश्वापुढे मन लीन होते.पौर्णिमेचा चंद्र हा भेदभाव न करता सर्वांना सारखा प्रकाश देतो, त्याप्रमाणे विवेकी मन सगळ्यांना प्रसन्न ठेवते. याला 'समदृष्टी' म्हणतात. अशी दृष्टी मनाजोगे झाले तरीही स्थिर राहते. मनाविरूद्ध झाले तरीही स्थिर राहते. याचा अनुभव भवरलालजींसमवेत काम करताना अनेक सहकाऱ्यांनी खूप वेळा घेतलेला आहे. त्यामुळे भाऊंचे परिपक्व मन सतत नवनवीन शोधांची कशी जननी बनले हेही आपण अनुभवले आहे. इतकेच नव्हे तर या मनाने नव्या-नव्या जाणिवांना नव्या-नव्या शाखांना आणि नव्या-नव्या संशोधन व तंत्रज्ञानाला कसा जन्म दिला हेही आपण पाहिले आहे. येथे भाऊंच्या बुद्धी निश्चयाचे दर्शन होते. निश्चयात्मक बुद्धी विविध शोधांना मदत करते. यामुळे ज्ञान-विज्ञान हा व्यापक योग ठरतो. ज्ञान-विज्ञान, योगातून व्यापक मन घडते. स्वतः स्वतःचा अनुभव घेतो. या अनुभवात तो संपूर्ण विश्व होतो. असा अनुभव शब्दातून मांडता येत नाही. तो मनाने जाणावा लागतो तेव्हा मनाची धाव आभाळाला कळते. माती बुक्का होतो. विश्व विठ्ठल होतो.

### जैन हिल्सवर स्वत:चा निसर्ग केला उभा !

गुरुकुल शिक्षणातला तिसरा विषय म्हणजे सहयोग. निसर्ग आणि मानव यांच्या साहचर्यातून होणारा विकास म्हणजे सहयोग. यातून मानवाचे सौजन्य आणि सृष्टीचे सौंदर्य एक होते. समाजाचा एकोपा निरोगी होतो. या गोष्टी निरंतर सेवा परायणतेतून घडतात. भाऊ निसर्गपूजक होते. निसर्गातच त्यांनी ईश्वरतत्व बघितले. निसर्गाची लय ओळखली. निसर्ग आणि आपण सख्खे आहोत



*युनायटेड किंगडम येथील माईक रायन यांचेसोबत एक्स्ट्रूजन मशीन विषयी माहिती जाणून घेतांना भवरलाल जैन*



# भाऊंचे जीवन अमृतानुभव देणारे!

लोकमनावर शब्दाचा जितका परिणाम होतो त्यापेक्षा अधिक परिणाम जीवनाचा होतो. भवरलालजींचे जीवन अमृतानुभव देणारे होते. त्यातल्या सामर्थ्याने त्यांच्याशी संपर्क आलेल्या प्रत्येकाला मोहित केले. जगण्यातला अस्सल मूलभूत साधेपणा त्यांच्यात होता. म्हणून ते विश्व मोहरे लावू शकले. सेलिब्रिटी हे नाही करू शकत. त्यांना रंगण्यासाठी पार्लर लागतात. भाऊंचे जीवन हेच आगळेवेगळे मूल्य होते. त्यामुळे भवरलाल हे केवळ विशेषनाम राहिले नाही. ते मूल्यात्मक विशेषण झाले. त्यांच्या व्यक्तित्वातली करूणा सर्वांसाठी प्रकाशदायी ठरली. बोलावे कसे, लिहावे कसे, वाचेने अवगुण सोडावे कसे किंवा काम स्वच्छ मनाने करावे कसे याचा वस्तुपाठ त्यांनी स्वतःच्या वागण्यातून सहकाऱ्यांसमोर ठेवला. खळत्वावर विजय कसा प्राप्त करावा याच्या सूचना देताना त्यांनी भावार्थाला अनुभवाची जोड दिली. या साऱ्या बाबतीत जागराची जाणीव जोपासली. जिथे परखड व प्रखर बोलणे आवश्यक आहे तिथे त्यांनी तसेच बोलणे केले. जिथे मृदू, मवाळ बोलून काम होणे शक्य आहे तिथे त्यांनी तोच ठोका वापरला. आज भाऊंच्या प्रतिभेविषयी आणि तत्वज्ञानाविषयी जितका व जेवढा विचार करू लागतो तितके मन अथांग होत जाते. ठाव शोधून नाही हाती लागत. म्हणून मनाने भाऊंचा हात पक्का घट्ट धरतो नि सांगतो, "सोडू नका, तुमचा हात आमच्या पाठीवर आहे तोवर आम्ही न डगमगता पुढची वाटचाल करीत राहून जगभर जैन इरिगेशनचा झेंडा फडकवित राहू!"



जैन हिल्स येथील सोलर पंपींग स्टेशनची पाहणी करतांना मोठे भाऊ सोबत अशोक जैन, अतुल जैन, अभेद्य जैन, संजय सोनजे, अजय काळे व चोरडिया इत्यादी

याची जाणीव करून घेतली. तशी जाणीव भाऊंनी सहकाऱ्यांनाही करून दिली. निसर्गावर मात करण्याचा, कुरघोडी करण्याचा प्रयत्न करू नका. त्याच्या हातात हात घालून चालत राहा, हे त्यांनी आवर्जून व वारंवार सगळ्यांना सांगितले. जैनहिल्सवर स्वतःचा निसर्ग उभा करताना होणारा प्रचंड त्रास, करावी लागलेली मेहनत आणि सहकाऱ्यांनी घेतलेले कष्ट याची पुरेपूर जाणीव भाऊंना असल्यामुळेच त्यांनी 'कहाणी कष्टपाणलोटांची' हे अतिशय सुंदर पुस्तक पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमावर लिहिले. निसर्ग प्रसन्न असेल तर माणसाची पिढी सक्षम घडते. मानवी आरोग्य निरोगी राहते. मानवाला दीर्घ आयुष्य मिळते. माणसाला जीवनसत्वांचा कितीही पुरवठा मिळाला तरी मूळ चैतन्य निसर्गातून मिळते. चैतन्य शुद्ध असेल, तर माणसाचे जगणे मंगलप्रभा ठरते. माणूस निसर्गाचे मूल आहे, हे वाक्य पिढ्यानपिढ्या आपल्या मनावर जे पडले ते खरे आहे. फक्त त्यांचा खोलात जाऊन आपण नेमका अर्थ समजून घेत नाही. भाऊंनी त्यांच्या सर्व लेखन, भाषणे व संवादामधून हा अर्थ स्पष्टपणे सांगायचा वारंवार प्रयत्न केलेला आहे. पण त्यासाठी आपण त्यांची पुस्तके, वाचली पाहिजेत, भाषणे ऐकली पाहिजेत. हे करायला आपल्याला वेळ कुठे आहे? आपला सगळा वेळ मोबाईलवर चीट चॅटींग, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअप, रिल्स आणि मोबाईलशी खेळण्यातच चालला आहे.

### भाऊंचे जगणे हा सत्याचा प्रकाश

खरं तर निसर्गाला पंचमहाभूतांचे कवच असते. निसर्ग माणसाला सांभाळतो. माणसाने निसर्गाला सांभाळलेच पाहिजे. निसर्गाचा अवकाश विशुद्ध ठेवला पाहिजे. अवकाशावर आक्रमण



होता कामा नये. अवकाश तोडला, की माणूस संपला. मानवी जीवन समृद्ध करण्यात निसर्गाचा वाटा मोठा आहे. विज्ञानाने माणसाला बौध्दिक सामर्थ्य दिले. निसर्गाने माणसाला आत्मिक सामर्थ्य दिले. जीवनाच्या कक्षा विस्तृत केल्या. निसर्गाला आदिमानवाने देव मानले. ऋषी-मुनींनी अरण्ये जपली. संतांनी अरण्यांना ईश्वर मानले. वृक्षांना सोयरे मानले. वेली माहेरवाशीण ठरल्या. पशुपक्षी आप्त झाले. सूर्य पालक झाला. पृथ्वी आदिमाता ठरली. अग्नीने तेज दिले. वायूने स्पर्श दिला. आकाशाने या सगळ्या अनुभवाला सुंदर शब्द दिले. हे शब्द भवरलालजींनी आपल्या सर्व सहकाऱ्यांपर्यंत पोहचवून त्यांना निसर्गासमवेत उन्नत जीवन कसे जगावे याची नवीन दृष्टी दिली. संकटात सापडलेल्या आपल्या कंपनीला प्रचंड मेहनत करून, कल्पक दृष्टी ठेवून व प्रामाणिकतेच्या बळावर पुन्हा कसे उभे करता येते हे भाऊंनी जगाला दाखवून दिले. त्यांचे हे प्रयत्न हा सत्याचा प्रकाश होता. एक प्रकारे त्यांनी केलेली सूर्याची प्रार्थना होती. या प्रार्थनेतून मिळालेल्या आत्मशक्तीतून ते फिनिक्स पक्ष्यासारखे पुन्हा भरारी घेत उभे राहिले. निसर्गाच्या प्रलयात उद्याच्या सृष्टीचे सर्जन आहे, हे अचूक ज्ञात असलेल्या भाऊंनी म्हणूनच उदात्ततेची रम्य पहाट पाहिली. निसर्ग समृद्ध केला. त्याचा योग्य वापर केला. निसर्ग माणसाला प्रेम शिकवितो. माणूस निसर्गाला प्रेम देतो. प्रेमाच्या जिव्हाळ्यातून मानवजात बऱ्यापैकी सुरक्षित आहे. ही निसर्गाची कृपा समजायला हवी. हीच भाऊंनी उभ्या केलेल्या जैन हिल्सच्या तीर्थाची संकल्पना व संदेश आहे.

सगळ्या झाडांची मुळे मातीच्या कुशीत एकोप्याने, एकजुटीने राहतात. ते कधी एकमेकांशी भांडत नाहीत, रुसवे फुगवे करत नाहीत. एकमेकांना सहकार्य करून ती सगळी झाडे आनंदाने जगतात यालाच सहयोग म्हणतात. जैन इरिगेशन कंपनी मध्ये काम करणारे सर्व सहकारी अशा सहयोगाने राहिले पाहिजेत असा भाऊंचा आग्रह व प्रयत्न होता. झाडांपासून हा गुण माणसांनी घेतला पाहिजे असे त्यांचे सांगणे होते. या बोधाकरिता लाखो वृक्ष त्यांनी जैन हिल्सवर आणि कामाच्या प्रत्येक ठिकाणी लावले. वृक्ष हेच माणसाचा वंश आहेत. पिढ्यानपिढ्या जपण्याचे काम वृक्ष निमूटपणे करतात. वृक्ष स्वतः हून ऊन घेतात आणि पांथस्थाला सावली देतात. निसर्गाची प्रत्येक ऋतुत निरनिराळी रूपे आहेत. त्या त्या ऋतुतला निसर्ग माणसाला वाचता आला पाहिजे. अनुभवाशिवाय निसर्ग वाचता येत नाही. त्यासाठी मनाची खिडकी सतत उघडी ठेवावी लागते. महिन्या-महिन्यात निसर्गात होणारे बदल अभ्यासावे लागतात. माणसाने शारीरिक तंदुरुस्तीसाठी औषधे निर्माण केली, पण मन आणि शरीर या दोघांना संतुलित ठेवण्याचे काम निसर्गाने केले. निसर्ग हे दिव्य औषध आहे. तसाच तो माणसाचा मित्र आहे. माणूस निसर्गात वाढतो. त्याची वाढ वाढदिवस साजरा करून होत नाही, तो निसर्गाशी किती एकरूप व एकजीव होतो यावर त्याचे माणूसपण ठरते. याचा अर्थ सुधारणा आणि निसर्ग यांचा समतोल साधत माणसाचा निसर्गाशी सहयोग घडला पाहिजे हेच गुरुकूल शिक्षणातले महत्वाचे अंग आहे. ते भाऊंनी समर्थपणे कृतीतून शिकविण्याचा प्रयत्न केला.

### श्रमनिष्ठा व ज्ञाननिष्ठेचा सुरेल समन्वय

भाऊंनी गुरुकुलात श्रमनिष्ठा व ज्ञाननिष्ठा यांचा समन्वय



जैन प्लास्टिक पार्क येथील कंपनी उभारणी दरम्यान जॅक लांगा यांच्यासोबत भवरलाल जैन, अशोक जैन, अतुल जैन, आर. बी. जैन व सहकारी

राखला. दोघांनाही सन्मानाने व समान आदराने वागविले. कोणामध्येही भेदभाव केला नाही. ज्ञान आणि श्रम ही एकाच रथाची दोन चाके आहेत आणि ती सारख्याच वेगाने चालली पाहिजेत, इतकेच नव्हे तर ती हातात हात घालूनच चालली पाहिजेत. तरच आपण अंतिम ध्येयापर्यंत पोहचू शकू याची भाऊंना पुरेपूर जाणीव असल्यामुळे त्यांनी कोणताही दुजाभाव न करता दोघांनाही समत्व भावाने वागविले. अगस्ती ऋषींनी कुदळ घेऊन कृषी-कर्माबरोबरच ज्ञानोपासना चालू ठेवली. त्यातून दक्षिण भारताची वसाहत निर्माण झाली. याचा अर्थ ज्ञानप्रधानवर्गाने काहीसे श्रमप्रधान व्हावे, आणि श्रमप्रधान वर्गाने काहीसे ज्ञानप्रधान व्हावे अशीच दृष्टी व कामाची पद्धत भवरलाल भाऊंनीही ठेवली. परमेश्वराने माणसाच्या दोन्ही हातांना मिळून दहा बोटे दिली आहेत. ज्ञानाचे म्हणजे लेखनाचे शिक्षण तीन बोटांत मावते. पण आम्हाला हवे ते दहा बोटांचे शिक्षण. दहा बोटांनी म्हणजे हातांनी श्रम होतात. ही सगळी बोटं एकजीव झाली तर श्रमनिष्ठा आणि ज्ञाननिष्ठा यांचा सुरेल संगम होऊन काम अतिउत्कृष्ट होईल असा भाऊंचा दावा होता. त्यामुळे त्यांनी गुरुकुलामध्ये या दोन्ही गोष्टींचा दिव्य संगम घडवून आणण्याचा प्रयत्न केला. तशी शिक्षण पद्धती गुरुकुलात विकसीत केली. त्यामुळे भाऊ तत्वज्ञ झाले, मित्र झाले आणि मार्गदर्शकही झाले. जीवनाच्या मूलभूत समतेची कळ त्यांना अचूक सापडली होती. त्यामुळेच त्यागाला आणि प्रेमाला त्यांनी स्थान दिलेच पण समोरच्याच्या शब्दांवर विश्वासही ठेवला.

## सहकाऱ्यांमध्ये सामुहिक शक्तीची उभारणी

गुरुकुल पद्धतीतला आणखीन एक महत्वाचा शैक्षणिक घटक म्हणजे ‘आध्यात्मिक ज्ञान’ हा होय. आध्यात्मिक ज्ञान म्हणजे पोथ्या, पुराणे, धार्मिक ग्रंथ वाचणे व पूजणे नव्हे. आध्यात्मिकता म्हणजे अंतरंगाचे भान, अंतरंगाची शुद्धी. मी माझ्यापुरते न पाहता सहवृतीतून सर्वांचा होणे. सुख असेल तर ते सर्वांनी मिळून भोगायचे. दुःख असेल तर तेही सर्वांनी वाटून घेऊन भोगायचे. आम्ही सारे एक आहोत. आमच्या जगण्याचे विशिष्ट भान आम्हाला आहे, यातून सामूहिक शक्ती विधायक कार्य करते. अशी सामूहिक शक्ती प्रयत्नपूर्वक सहकाऱ्यांमध्ये उभी करण्याचे काम भाऊंनी कायम केले. त्यामुळे अनेक नवनवीन प्रकल्प उभे राहू शकले. बुद्धी व्यापक झाली. कर्मचारी कार्यकुशल झाले. उत्तम ज्ञानी निर्माण झाले. त्यांचा आत्मविश्वास दुणावला. भीड चेपली. कोणतेही काम आम्ही एकदिलाने व खांद्याला खांदा

लावून पूर्ण करू शकतो ही भावना निर्माण झाल्याने भीती पळून गेली. अज्ञानाचा अंधार दूर झाला. आत्मज्ञानांच्या भानातून नव्या वाटा निर्माण करीत नव्या काळाचे नवे सूर्य पाहणे हे भाऊंच्या गुरूकुलाचे ध्येय बनले. यातूनच सहकाऱ्यांची महत्वाची कर्तव्ये व्यक्त झाली.

ही कर्तव्ये पूर्ण करण्यासाठीच्या तीन पायऱ्या भाऊंनी सहकाऱ्यांना सांगितल्या. त्यातली पहिली पायरी श्रवण आहे. दुसरी पायरी मनन आहे आणि तिसरी पायरी निदिध्यास आहे.

### कर्तव्य पूर्तीच्या तीन पायऱ्या

श्रवण म्हणजे केवळ ऐकणे नव्हे. कानांना श्रुती करणे. श्रुतयुक्त ऐकण्याची व चांगले ऐकण्याची सवय लावणे. कान कायम उघडे असले तरी कानांनी माणूस कायम ऐकतोच असे नाही. माणूस तर फार मजेशीर प्राणी आहे. तो आपल्याला जे सोयीचे असेल तेच ऐकतो. गैरसोयीचे असेल तर ते सोडून देतो. कधी सोडून देण्यात महत्वाचे श्रवण असते. ते त्याच्या हिताचे असते. यासाठी सारी इंद्रिये सतत सावधान ठेवावी लागतात. सोशिकता श्रवणातली आंतरिक सूक्ष्मता वाढविते. ऐकताना अनुभव होऊन जाण्यात श्रवणाचे खरे गुह्य असते. ते फार थोड्यांना जमते. बाकी सर्व आपापल्यात गुरफटलेले असतात. त्यामुळे कुणीच कुणाचे ऐकत नाही. जो तो दुसऱ्याला ऐकविण्याच्या खटपटीत असतो. उद्योगातले सहकारी असे असून चालत नाहीत. त्यांनी काम काय व कसे करायचे आहे हे व्यवस्थित ऐकून घेऊन त्या पद्धतीने पूर्ण केले पाहिजे. म्हणजे त्याला श्रवणाचा शिस्तबद्ध कान असला पाहिजे. बरीच माणसे दुसऱ्याचे ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नसतात. एखाद्या माणसामध्ये मी पणा किंवा अहंकार अगदी ठासून भरलेला असेल तर तो दुसऱ्यांना तुच्छ समजून ऐकण्याच्या मनस्थितीत राहात नाही. अशा वेळी कामाचा पूर्ण सत्यानाश होण्याची शक्यता असते. या धोक्याचा अनुभव मोठ्या भाऊंनी स्वतः अनेकदा घेतलेला होता. त्यामुळे अनुभवातून तावून सुलाखून निघालेल्या त्यांच्या शिक्षणाने सहकाऱ्यांना अगोदर व्यवस्थित ऐकून घेण्याची सवय लावली. व्यवस्थित ऐकलेले असेल आणि समोरच्याचे मनापासून ऐकण्याची तयारी असेल तरच कामाची उमज नीट होऊ शकते आणि ते काम पूर्णत्वाला कसे न्यायचे याची मार्गक्रमणाही आखता येते.

उमज हा शब्द आपल्या वापरात कमी आहे. कारण समज असेल तर उमज पडते. मुळात समजच नसेल तर रोज आरडा ओरडा होतो आणि मेमो, नोटीशींचा पाऊस पडतो. 'समज' यामध्ये सम आहे. हीच जगण्याची सम आहे. उमज ही जगण्याची नस आहे. आपण समज हा शब्द अनेक समजुतींमुळे फार गुळगुळीत



अनुभूती शाळेच्या कामाची पाहणी करताना मोठेभाऊ



जैन प्लास्टिक पार्क येथील टूलरूम विभागात स्वामीनाथन यांच्या समवेत कार्यमग्न भाऊ

केलाय. समज यायला जन्मजात समज लागते. या समजेला खोली आली की उमज येते. उमज म्हणजे समजेच्या खोलीचे अर्थगर्भ मौन. समज काहीशी प्रकट होते. उमज अप्रकटातून प्रकटते. वारा दिसत नाही, पण स्पर्शाने जाणवतो. तशी उमज दिसत नाही, पण व्यक्तित्वातून जाणवते. उमज आपसूक येते आणि परिस्थितीनेही येते. आपणच आपला मूल्यात्मक विचार करण्यासाठी उमज उपयोगी पडते. समजण्यात समज कमी पडू शकते. उमजेत समज परिपक्व होते. त्यामुळे काहीही उणे पडत नाही. आयुष्याची वळणे आपल्याला स्वच्छ अनुभवता येतात. चित्शक्तीचा अनुभव आपण यातून घेतो. उमज येण्यासाठी आधी स्वतःला आरपार वाचीत राहावे लागते. वाचनातून आकलन वाढवायचे. आकलनातून मननात उतरायचे. अभ्यासाचा चौफेर फुलोरा वाढवायचा. हळूहळू स्वतःशी बोलायला लागायचे नि सर्व प्रकारच्या अनुभवांना सामोरे जायचे. लीनपणे प्रत्येक अनुभवातून शिकायचे. यातून जी नवी जाणीव निर्माण होते, तिला उमज म्हणतात. अशी उमज कामाच्या कार्यपद्धतीशी सांगड घालते. भाऊंनी गुरुकुलात ज्या पद्धतीचे व ज्या पद्धतीने शिक्षण सहकाऱ्यांना दिले त्यातून उमज उत्तमरित्या वाढीला लागल्यामुळे श्रवणाचा कान सुरेल तयार झाला.

## मननातून आपली स्वतःची तपासणी

कर्तव्य पूर्ण करण्यातली दुसरी पायरी ही मननाची आहे. श्रवण केलेले मनात घेणे आणि त्याचा साधक बाधक विचार करून आत्मस्वरुपाचा निश्चय करणे याला मनन म्हणतात. विज्ञान आणि अध्यात्माप्रमाणेच मननाला प्रत्येक कामात फार महत्व आहे. मननाने अधिकतम आपण आपल्याला तपासतो. भाऊंसारख्या आत्मज्ञानी व्यक्तींच्या सानिध्यात केलेले मनन अनुभवी करते. ते आत्मानात्मविवेक देते याचा अनुभव पुष्कळ सहकाऱ्यांनी घेतलेला आहे. मननाने विद्वत्ता वाढत नाही, तर विद्वत्तेला विनम्रतेची खोली लाभते. आपण समोरच्याला किती फसवतोय की हसवतोय यावर मनन नसते. समोरच्याचे खरे स्वरूप त्याला कितपत आकळतेय, तो त्याच्या मनाच्या डोहातल्या तळाचा कितपत वेध घेतो यावर मनन अवलंबून असते. ते कळायला अभ्यास, श्रवण, परीक्षण, आकलन हे लागते. मन समजायला मनन हवे. भाऊ फॅक्टरीत असोत किंवा जैन हिल्सवरील चेअरमन कार्यालयात असोत, संवादाबरोबरच ते बराच काळ मननही करीत. त्यासाठी काही वेळ एकांतात बसत. मनाचा आवाज ऐकू यायला आपण हलके व्हावे लागते. निव्वळ

जड भारी असून जमत नाही. ही कला योगसाधनेमुळे भाऊंना फार उत्तमरितीने साधली होती. वृत्तीमधील चंचलता उपयोगी नसते हे भाऊंना पक्के ठावूक होते. त्यामुळे चंचल सहकाऱ्यांना ते बऱ्याचवेळा उपदेशाचे बाळकडू लहान मुलांप्रमाणे समजून सांगून पाजत असत. एकाग्रपणे इंदियांना लववून मनाचा खोल खोल विचार करू लागलो की मननाचा आरंभ होतो. मन म्हणजे फक्त माणसापुरता विचार असे नाही. मनात सृष्टी, विश्व, कुतूहल, जिज्ञासा असे येते. स्वतःचे मन स्वतःला समजणे फार अवघड आहे. जिथे स्वतःला स्वतःचेच मन धड कळत नाही, तिथे दुसऱ्यांचे मन काय कळणार? भाऊंना समोरच्या व्यक्तीचे मन ओळखण्याची कला अवगत होती. त्यामुळे मनातल्या त्याच्या हालचालींचा अंदाज घेऊनच ते प्रश्नांची फेक करीत असत. आधी मन कळावे, मग ते वळावे, नि नंतर सखोल चिंतनात रमावे अशी कार्य करून घेण्याची भाऊंची पद्धत होती. भाऊंचे बोलणेही शांत, गहन समुद्रासारखे स्थिर व खोल होते. त्याच्या श्रवणाने विषयाची पुरेपूर कल्पना येत असे . मग मननाने अनेक शंकाकुशंकांचे निराकरण होत असे. बुद्धी ज्ञानाबद्दल निश्चिंत होत असे. नवनवीन विविध प्रयोग करायला मननाची गरज असते. मोठ्या भाऊंचे तर सगळे काम नवीन संशोधन व प्रयोगांचेच होते. त्यामुळे ते स्वतः आणि त्यांचे सहकारीही कायम मननाच्या निरांजनातच तेवत असत. मननाने मन मोठे होते. ते अनेक मनांना जोडते. नवनिर्मितीच्या व भव्यदिव्य काही उभे करण्याच्या कामामध्ये मन जोडण्याला आणि मननाला खूप महत्व आहे. भाऊंचे मन आणि मनन असे अलौकिक होते. जणू काही ते देवाचेच होते.

### निदिध्यासाने जगण्याला जीवंतपणा!

कर्तव्य पूर्तीतली तिसरी पायरी ही निदिध्यासाची आहे. मननाने माणसात आत्मविश्वास येतो. यातून तो आत्मविचारात गढतो. आत्मविचार म्हणजे आत्म्याबद्दलची सूक्ष्म जाणीव. आत्म्याच्या सतत चिंतनशील प्रक्रियेस निदिध्यास म्हणतात. सहकाऱ्यांनी भाऊंच्याकडून श्रवण केलेले किंवा सहवासातील सुसंवादातून घडलेले आणि स्वतःतल्या मननातून विचाराने



जैन टिश्यूकल्चर केळी रोपांचे उत्पादन करणारी लॅब बघतांना भाऊ सोबत डॉ. अनिल पाटील



फळ प्रक्रिया विभागात जापनीज पाहुण्यांसमवेत सहकाऱ्यांशी संवाद साधताना भाऊ

निश्चित केलेले ज्ञान निदिध्यासात येते. ते जेव्हा प्रत्यक्ष जीवनात प्रकटते तेव्हा जगण्यातला जीवंतपणा सर्व बाजूंनी फुलतो. आत्मचिंतनातून आत्मज्ञान स्त्रवते. संत ज्ञानदेवांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ते 'स्वसंवेद्य' होते. स्वतःच्या संवेदना अर्थपूर्ण आकळतात. मननातला स्व हे सारे समजायला सहाय्य करतो. भाऊंनी विज्ञान आणि अध्यात्म या दोन्हींची उत्तम सांगड घालून निदिध्यासाला कायम जागे, तेवते ठेवले. याचा अर्थ त्यांनी अध्यात्म आणि विज्ञान या दोन्हीला प्राधान्य देऊन त्याचा पुरेपूर वापर कामात करून घेतला. इंद्रियांनी निरीक्षण करून बुद्धीच्या निकषांवर ते तपासणे हे विज्ञानाचे काम आहे. इंद्रियांच्या पलीकडे जाऊन विश्वाचा वेध घेणे आणि जीवनाचे सर्वोत्कृष्ट मूल्य सांगणे हे अध्यात्माचे काम आहे असे सहकाऱ्यांना कायम सांगणाऱ्या भवरलाल भाऊंचे अध्यात्म हे विवेकावर आणि ध्यानावर आधारित होते. विज्ञानाचे व अध्यात्माचे भांडण नाही हे भाऊंनी पुन्हा पुन्हा सांगितले. भाऊंनी सहकाऱ्यांच्या मनातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, बुरसटलेले विचार यांना कायम प्रबोधनाच्या



मार्गाने जाऊन तिलांजली देण्याचा प्रयत्न केला. नवे विचार, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन यांचा अंगीकार केल्याशिवाय आपण जागतिक व्यापार युद्धात टिकू शकणार नाही याची पुरेपूर जाणीव भाऊंना होती. त्यामुळे प्रत्येक काम करतांना त्यांनी या गोष्टींकडे बारकाईने पाहिले. विज्ञान भौतिकीत अधिक रमते. अध्यात्म अंतरंगात अधिक खुलते. चिरंजीव मूल्यांचा शोध अध्यात्म घेते. जीवनाला व्यापणारे कुतूहल आपल्या सर्वांच्या मनात सतत असते. भाऊ कायम सांगायचे, "आकाशातले अनंत तारे आणि माणसाच्या अंतःकरणात वास करणारी सद्सदविवेकबुद्धी याबाबी पाहिल्या की मन आदराने भरून येते."

## ज्ञानी बनण्याचेच शिक्षण

भाऊंच्या प्रत्येक कामाला व नवनिर्मितीला ज्ञानाची झालर होती. निव्वळ पैसा आणि बक्कळ नफा मिळविणे हे त्यांचे ध्येय कधीच नव्हते. त्यामुळे त्यांनी सहकाऱ्यांनाही प्रामाणिकपणे वागून ज्ञानी बनण्याच्याच रस्त्याने वाटचाल करायला लावली. त्याच पद्धतीचे त्यांना शिक्षण दिले. ज्ञा म्हणजे जाणणे. ज्याच्या योगाने जाणले जाते ते ज्ञान. (ज्ञायते अनेन इति ज्ञनम) ज्ञानाचे तर्काधारे परीक्षण करून ज्ञानाचे शुद्ध रूप ठरविण्याचे कार्य ज्ञान मीमांसा करते. ज्ञान म्हणजे वस्तुची यथार्थ जाणीव. ज्ञानाचा विषय होणारी वस्तू आणि ज्ञान करून घेणारा 'मी' याला ज्ञेय-ज्ञात संबंध म्हणतात. आद्य शंकराचार्यांनी ज्ञानाची व्याख्या अशी केलीय, ज्ञान म्हणजे वस्तूच्या स्वरूपाबद्दल निःशंक आणि यथार्थ जाणीव होय, मात्र ज्या ज्ञानात वस्तू यथार्थपणे कळते आणि त्यावर स्थिर श्रद्धा निर्माण होते ते खरे ज्ञान असते. भाऊंचे ज्ञान अशा प्रकारचे असल्यामुळे सगळ्या सहकाऱ्यांनी मनापासून त्यांच्या ज्ञानाचा, अभ्यासाचा, अनुभवाचा, मननाचा आणि निदिध्यासाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यांच्या गुरुकुलातील या शिक्षण पद्धतीमुळे अनेकांची मने आणि व्यक्तिमत्वे घडली. श्रद्धेने ज्ञान मिळते आणि ज्ञानाने शांती मिळते हे भाऊंच्या जीवनाकडे पाहिले की समजत असे. ज्ञान हे जाणीवरूप म्हणजे केवळ अनुभवरूप आहे. ज्ञानाचे मूळ रूप आणि ज्ञानाचा परिणाम यांचा यात विचार येतो. ज्ञान म्हणजे आपण स्वतः आहोत ही जाणीव. आपल्याला जे स्वतःचे ज्ञान होते त्यामध्ये असणे व जाणणे हे दोन्हीही येते. येथे ज्ञाता-ज्ञेय एक असते. अशा शुद्ध जाणीवेला स्व-संवेद्य म्हणतात. ते सूक्ष्म असते. ज्ञानात यथार्थ श्रद्धा असते. त्यात स्वतः सिद्धता असते. त्यासाठी आयुष्याची होळी पेटवून त्यात कष्टाच्या व अभ्यासाच्या समीधा ओतलेल्या असतात. त्यातून जो अग्नी प्रज्वलित होतो तो मनामनांना कर्तृत्वाच्या शिखरांवर उभे करतो. अशी अनेक शिखरे उभे करणारे सहकारी भवरलाल जैन यांनी त्यांच्या गुरूकुल शिक्षण पद्धतीतून उभे केले. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा व किर्तीचा सुगंध आजन्म जगभर पसरत राहील अशी आमची भावना व श्रद्धा आहे. भाऊंच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वाला व स्मृतीला विनम्र अभिवादन करून एवढेच म्हणतो, झाले बहू, होतील बहू परंतु या सम हाच!

# भाऊंच्या जिज्ञासेला अभ्यासपूर्ण खोली!

**डॉ. के. बी. पाटील**
माजी कुलगुरू - कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव



भवरलाल जैन यांचा दृष्टीकोन फारच विशाल होता. अनेक विषयांमध्ये त्यांना गती, रस आणि अभ्यास होता. प्रत्येक गोष्टीत विचार विनीमय करीत असताना चार गोष्टी नवीन समजल्या पाहिजेत अशी त्यांची जिज्ञासा होती. जिज्ञासा हा मानवाचा न मावणारा अवकाश आहे. कधीही न संपणारी ती तितिक्षायुक्त वाटचाल आहे. भाऊंच्या जिज्ञासेत जसे मोठे कुतूहल होते तशी अभ्यासपूर्ण खोलीही होती. आजन्म चिंतनात राहून समाजाला अमरत्वाचा नवा प्रकाश देण्याची जी शक्ती आहे तिला जिज्ञासा म्हणतात. भाऊंच्या रोमारोमात ही जिज्ञासा ठासून भरलेली होती. त्यामुळे चर्चेत त्यांना कोणताही विषय वर्ज्य

नव्हता. प्रत्येक विषयाचे खोलीचे ज्ञान त्यांच्याजवळ असले तरी नवीन ज्ञान जाणून घेण्याची त्यांना प्रचंड आवड होती. प्रत्येक गोष्ट जाणण्याची इच्छा जशी त्यांच्या जिज्ञासेत होती, तशी ईच्छेच्या निरीक्षणाची व्यापकताही होती. उपनिषदातली पहिली आज्ञा आहे: 'अथा तो ब्रह्मजिज्ञासा'. जाणून घ्यायची मनापासून तयारी असेल तर कोणताही विषय अवघड नाही हे भवरलालजींनी स्वतः च्या जीवनातून सिद्ध करून दाखविले होते. त्यामुळे ब-याचदा आम्ही जेव्हा गप्पा मारायला बसायचो तेव्हा भाऊंना किती विषयांमध्ये प्रचंड ज्ञान आणि गती आहे हे पाहून आश्चर्यचकित व्हायला होत असे. त्यांची जिज्ञासा सतत जागृत असल्यामुळे ते वेगवेगळ्या विषयांच्या अभ्यासामध्ये कायम रमलेले असायचे.

झाली नव्हती. काही वर्षे मी ही कॅनडामध्ये असल्यामुळे भेटीचा वा ओळखीचा प्रसंग आला नाही. मी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामध्ये रजिस्ट्रार म्हणून आल्यानंतर पत्रकारिता विभागाने विद्यापीठात एक परिसंवाद ठेवला होता. त्या परिसंवादात मी आणि भवरलाल भाऊ असे दोघेही वक्ते होतो. कुलगुरू अध्यक्षस्थानी होते. तेव्हा जळगांवमध्ये वासनाकांडाचे एक मोठं प्रकरण होऊन गेले होते. त्या प्रकरणाची वर्तमानपत्रातून व प्रसिद्धी माध्यमांमधून खूप चर्चा झाल्यामुळे जळगावचे नाव बदनाम झाले होते. तसेच एक वासनाकांडाचे प्रकरण आमच्या विद्यापीठातही घडले होते आणि शिरपूरच्या एका विद्यार्थ्याने आत्महत्या केली होती. या प्रकरणी दै. लोकमतने टोकाची भूमिका घेऊन हे प्रकरण खूप लावून धरले




*जळगाव येथे माजी कुलगुरू डॉ.के. बी. पाटील यांचा सपत्नीक सत्कार करताना भवरलाल जैन सोबत सौ. मालतीताई पाटील, श्री. बी. व्ही. पाटील*

मी त्यांच्यापेक्षा वयाने कितीतरी लहान होतो पण वडीलधारे असले तरी भाऊ मला नेहमी बरोबरीच्या नात्याने, मित्रासारखे वागवायचे.

माझी त्यांची खरी ओळख आणि मैत्री झाली ती २००० साली. तेव्हा मी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामध्ये रजिस्ट्रार म्हणून आलो होतो. त्यापूर्वी मी त्यांचे नाव पुष्कळदा ऐकून होतो. धुळे हे माझे गाव आणि कर्मभूमी असल्यामुळे एक मोठे उद्योगपती म्हणून भवरलाल जैन यांचे नाव मी नुसते ऐकून होतो. प्रत्यक्ष भेट कधी

होते. विद्यापीठाची प्रचंड बदनामी होत होती. रोज या प्रकरणाच्या मोठ्या मथळ्यांखाली बातम्या येत असल्यामुळे लोकांकडूनही सातत्याने विचारणा होत होती आणि हा विषय सतत चर्चिला जात होता. या प्रकरणाचा उल्लेख या परिसंवादातील भाषणात मी केला. मी भाषणात असे म्हणालो, "विद्यापीठाचे चुकले असेल तर चूक दाखवून देणे अत्यावश्यक आहे. त्याबद्दल आमची ना नाही पण विद्यापीठच संपविणे ही भूमिका कोणी घेत असेल तर ते चुकीचे आहे" माझे हे सडेतोड बोलणे व स्पष्ट



गांधी जयंती उत्सवानिमित्त कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात गांधी चेअर येथे उपस्थित डावीकडून अशोक जैन, वसंत कोरेगावकर, कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, लेले काका, नरेंद्र शर्मा, डॉ. एन. के. ठाकरे, भवरलालजी जैन, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, सदाशिवराव साठे, सुरेश दादा जैन, दलू भाऊ जैन, डॉ. जे. के. दोशी, रमेश दादा जैन आणि अन्य मान्यवर

भूमिका भवरलालजींना मनापासून फार आवडली आणि त्यांनी त्यांच्या भाषणात माझी भूमिका उचलून धरली. इतकेच नव्हे तर जाहीरपणाने त्यांनी भाषणातून माझ्या बोलण्याचे कौतुक केले. भवरलाल भाऊ त्यांच्या भाषणात म्हणाले," आम्ही सुद्धा या वासनाकांडाच्या प्रकरणातून गेलो आहोत. साप-साप म्हणून वृत्तपत्रांनी भुईला किती बदडले याचा अनुभव आम्ही घेतलेला आहे. वर्तमान पत्र व प्रसिद्धी माध्यमे ख-या खोट्याचा खोलात जाऊन तपास करीत नाहीत आणि सनसनाटी करण्याच्या मागे लागून भडक व अतीरंजित बातम्या देण्याच्या मागे लागतात. यात वर्तमानपत्राचा खप वाढावा एवढाच उद्देश असला तरीही निरपराध लोकांवर आपण किती अन्याय करतो आहोत याचे भान माध्यमांना राहात नाही. त्यामुळे समाजाची अधोगती होते. असत्याचा बभ्रा होतो. अशी पत्रकारिता देशाला विकासात फार पुढे नेऊ शकत नाही. "भाऊंचे हे स्पष्ट बोलणे त्यावेळी उपस्थितांना फार भावले होते आणि त्यांनी स्पष्ट बोलल्याबद्दल माझे आणि भाऊंचे टाळ्या वाजवून खूप अभिनंदनही केले होते.

मी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा कुलगुरू झाल्यानंतर तर त्यांना फार आनंद झाला होता. कुलगुरुपदी रुजू झाल्यानंतर चार-पाच दिवसातच भवरलालजींनी माझ्या सत्काराचा एक कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमाला सुरेशदादा जैन, कवी ना. धों. महानोर असे मोठे मान्यवर उपस्थित होते. समारंभाच्या ठिकाणी मी एका बाजूला कोप-यात बसलो होतो. अजून समारंभ



सुरू व्हायला अवकाश होता. मोठ्या लोकांमध्ये आपण जाऊन कसे बसावे म्हणून मी थोड़ा बूझलो होतो. मी कोपऱ्यात बसलोय हे बघून भवरलाल भाऊ माझ्या जवळ आले आणि हाताला धरून ओढून नेत व्यासपीठावर मध्यभागी खुर्चीत नेऊन बसविले आणि म्हणाले, "आज तुमच्या अभिनंदनाचा दिवस आहे. तुमच्या अभिनंदन व सत्कारासाठी आम्ही सगळे जमलो आहोत." खरं तर अभिनंदन करायला मन मोठे लागते. ज्याचे अभिनंदन करायचे, तो आवडावा लागतो. भवरलालजींचे मन तर मोठे होतेच पण माझ्याबद्दल त्यांच्या मनात प्रचंड प्रेम व आपुलकी होती. त्यामुळेच मनमोकळा संवाद ते माझ्याशी करीत असत. भाऊंच्या अभिनंदनात कर्तृत्वाला नेमकी मनापासून दाद देण्याची मानस तयारी सामावलेली होती. माणसांच्या संबंधा-संबंधातून यशाची लख्ख वीज चमकून जी दिव्यता लाभते, ती भाऊंच्या अभिनंदनात होती. ती मला त्या दिवशी पुरेपूर जाणवली. त्यामुळे माझ्याही मनाची उदारता वाढली आणि आमचा आपापसातला स्नेह अगदी घट्ट झाला. जगण्यातल्या नवनवीन गोष्टी सहज जवळ करता आल्यामुळे संवादातला भाव दृढ अशा मैत्रीत कधी रुपांतरीत झाला ते कळलेच नाही. यातून ब-याचदा संध्याकाळी निवांत झाल्यावर ते जेवायला, गप्पा मारायला बोलवायचे आणि तासनतास आम्ही निरनिराळ्या विषयांवर मनसोक्त बोलायचो. त्यांचा ऐकण्याचा कानही फार छान होता. समोरच्याचे बोलणे ते पूर्णपणे व शांत राहून ऐकून घ्यायचे.

डॉ. माळी सर विद्यापीठाचे कुलगुरू असताना त्यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाशी एक करार केला होता. हा करार गांधीतीर्थ विद्यापीठात उभारण्यासंबंधी होता. महात्मा गांधींजीच्या विषयी भाऊंच्या मनात प्रचंड आदर व श्रद्धा होती. त्यामुळे त्यांना भव्यदिव्य असे स्मारक गांधीजींचे उभे करायचे होते. पण अजून कामाला सुरुवात झालेली नव्हती. ते या स्मारकाची उभारणी करण्यासंबधीची चर्चा करण्यासाठी वारंवार विद्यापीठात येत होते. मी विद्यापीठांचा कुलगुरू झाल्यानंतर भाऊंशी या स्मारकाबाबत चर्चा चालू होती. पण भाऊंच्या मनात खूपच मोठी आणि भव्यदिव्य स्मारकाची कल्पना होती. ते करणे आम्हाला, विद्यापीठाला शक्य नव्हते. कारण यासाठी लागणारा प्रचंड पैसा आमच्या जवळ नव्हता आणि विद्यापीठाचे काम अनेक मंजूऱ्यांमध्ये अडकलेले असते. त्यामुळे निर्णय घ्यायलाही वेळ लागतो. परिणामी फार लवकर हे काम होणे शक्यच नव्हते. विद्यापीठातली एक टेकडी हे स्मारक करण्यासाठी निवडली होती. या टेकडीवर महात्मा गांधीजींचा पुतळा बसवायचा आणि इमारतीच्या एका हॉलमध्ये गांधीजींच्या जीवनाची प्रदर्शनी मांडायची अशी सुरुवातीची आमची कल्पना होती. त्या दृष्टीने टेकडी विकसीत करण्याचे कामही आम्ही सुरू केले होते. पण भवरलालजींच्या मनात गांधींच्या स्मारकासंबंधी फारच मोठा प्रकल्प होता. तो विद्यापीठाला करणे जमणार नाही हे लक्षात आल्यावर भाऊंनी तो प्रकल्प जळगावातील त्यांच्या जैनहिल्सवर नेण्याच ठरविले. आम्हांला सुरुवातीला थोडे वाईट वाटले. नंतर लक्षात आले, भाऊंच्या सारखे गांधीजींचे जागतिक दर्जाचे स्मारक उभे करणे आणि ते चिरंतन सांभाळणे ही विद्यापीठाच्या आवाक्यातली गोष्ट नाही. त्यामुळे झाले ते योग्यच झाले असे मानून स्मारकाच्या

उभारणीसंबंधी आम्ही कायम एकमेकांशी बोलत राहिलो. २०११ मध्ये माझा कुलगुरूपदाचा कार्यकाळ संपला. तेव्हांही भाऊंनी जळगावातील कांताई सभागृहात माझ्या कौतुकाचा व निरोपाचा कार्यक्रम ठेवला. निरोप घेताना-देताना आणि सांगताना नव्या भावार्थाची नाती निर्माण होतात हे त्या दिवशी आम्हां दोघांनाही प्रकर्षाने जाणवले. निरोपात सुख-दु:खाची घरटी उंचावर गेलेली होती. ती दिसतच होती असे नाही. पण माणसाच्या पुढच्या वाटचालीला दिसणारा प्रकाश निरोपात असतो हे त्या दिवशी उमजले. माणसाने माणसाला आधार देणे म्हणजे निरोप. आपुलकीचा नवा श्वास म्हणजे निरोप. जगायचा ध्यास ज्या आश्वासक शब्दांनी निर्माण होतो, त्याला निरोप म्हणतात. निरोपाने आमच्या ओळखी आणखीन घट्ट सायीसारख्या झाल्या. विद्यापीठाच्या जबाबदारीतून मोकळे झाल्यावर तर ते अधिक खुलेपणाने माझ्याशी बोलू लागले. त्यांच्या मनातील विचारांना वाट करून देऊ लागले. आपणही स्वतःचे एक विद्यापीठ स्थापन करावे आणि मुलांच्या उच्च शिक्षणासाठी विविध विषयांची महाविद्यालये काढावीत असा विचार भाऊंच्या मनात आला होता. त्यांनी तो संकल्प मला बोलूनही दाखविला. ज्या ज्या अनेक गोष्टी करणे त्यांच्या मनात होते त्याबद्दल ते मोकळेपणाने माझ्याशी बोलत. पण या सगळ्या गोष्टी करायला आणि मुख्य म्हणजे उत्तम दर्जाची कॉलेजेस व विद्यापीठ स्थापन करायला आजचा काळ सुसंगत नाही हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तो विचार सोडून दिला. अनुभूती शाळा काढल्यानंतर त्यांनी गरीब मुलांसाठीही जळगावात शाळा काढली. तशीच आणखीन एक शाळा मध्यमवर्गीयांच्या मुलांसाठी काढावी असे भाऊंच्या मनात होते. या शाळेसाठी थोडी फी आकारावी आणि अनुभूती इंग्लिश माध्यमाच्या निवासी शाळेच्या मदतीने ही मध्यमवर्गीयांची शाळा चालवावी असा त्यांचा विचार होता. तो संकल्प त्यांनी मला बोलूनही दाखविला. पण ते करणे त्यांना शक्य झाले नाही कसेबसे करणे सोपे होते. पण चांगले करणे फार अवघड होते आणि कसेबसे करणे हे भाऊंना कधीच मान्य नव्हते. जे काम करायचे ते सर्वोत्तम, सर्वोकृष्ट आणि अद्वितीय असले पाहिजे अशी भूमिका असल्यामुळे भाऊंनी मध्यमवर्गीय शाळेचा विचार त्यावेळी सोडून दिला.

भवरलाल भाऊ स्वतः खूप अभ्यासू होते. प्रत्येक विषयाचा ते बारकाईने अभ्यास करायचे. अभ्यास असेल तरच ते एखाद्या विषयावर बोलायचे, अन्यथा शांतपणे बसून ऐकायचे. "अभ्यासोनी प्रकट व्हावे । नाहीतर झाकोनी असावे । प्रकट



*जैन हिल्स येथील गांधी तीर्थ येथे गांधी जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना भवरलाल जैन सोबत न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. के.बी. पाटील, दलूभाऊ जैन व इतर मान्यवर*

# अनेकांची जीवने घडविताना शिक्षण हाच पाया!

ओबडधोबड दगडाला आकार देण्याचे काम शिल्पकार करतो. त्यातून तो सुबक व सुरेल मूर्ती घडवितो. कच्च्या मातीला तुडवून, मळून कुंभार सुपरफाईन चिखलाचा गोळा तयार करतो आणि त्यापासून मातीला आकार देऊन सुंदर वस्तु, कलाकृती निर्माण करतो. त्याच पद्धतीने भवरलाल भाऊंनी समाजातली, खान्देशातली, जळगावच्या आसपासच्या परिसरातील शेतकऱ्यांची, गोरगरिबांची, कष्टकऱ्यांची हजारो - शेकडो मुले गोळा करून त्यांना उत्तम शिक्षण दिले. त्या मुलांची अभ्यासाची आवड, विषयातील गती आणि काम करण्याची पद्धती पाहून त्यांच्या कलाकलानुसार त्यांना 'विषय तज्ज्ञ' (सब्जेक्ट स्पेशालिस्ट) बनविले. 'मी माझ्या कामाचा मालक आहे' ही ध्येयवादी वृत्ती त्या मुलांमध्ये निर्माण करून त्यांना कंपनीचे प्रमुख आधारस्तंभ व राष्ट्राचे जबाबदार नागरिक बनविले. या सगळ्याचा पाया शिक्षण हाच होता. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या भाऊंनी जगभरच्या ज्या अनेक कंपन्या जळगावात राहून चालविल्या त्याचा पायाही शिक्षण हाच होता. आपल्या विचार व मार्गदर्शनानुसार कंपन्या चालविणारी, काम करणारी तरुण पिढी घडवून भाऊंनी राष्ट्राच्या विकासात मोलाची भर तर घातलीच पण त्या तरुण मुलामुलींचे आयुष्यही मजबुतीने उभे केले. कितीतरी पदवीधर मुलांना देश-विदेशात शिक्षणासाठी पाठवून त्यांना पीएच.डी. (डॉक्टरेट) केले. त्यांनी घेतलेल्या विद्यापिठीय ज्ञानाला प्रत्यक्ष कामातून अनुभवाची जोड देत, ज्ञान व अनुभव यांची सांगड घालून प्रत्येक कामातला शेवटचा शब्द त्यांचा असला पाहिजे अशा पद्धतीने त्यांना घडविले. अशा पद्धतीने तरुण पिढी घडविण्यासाठी व्याकुळ झालेल्या भाऊंनी 'खान्देशातील भूमीपुत्रांनो! माहेरी परत या'... अशी जाहिरातही एकदा वर्तमानपत्रातून दिली होती. यावरून त्यांची शिक्षणावरची नितांत श्रद्धा व तरुणपिढी मजबुतीने उभी करण्याचा त्यांचा प्रखर ध्येयवाद व आस यांचे दर्शन घडल्याशिवाय राहात नाही.

होऊनी नासावे हे बरे नव्हें।" ही संत रामदास स्वामींची ओवी जणूकाही त्यांनी तंतोतंत आचरिली होती. अभ्यास हा शब्द मोठ्या भाऊंना पहाटेइतका प्रसन्न होता. जगण्याचा ताजा श्वास म्हणजे अभ्यास. याच भावनेतून त्यांनी अभ्यासाकडे पाहिले. उत्कृष्ट मैत्रीच्या संगतीतून अभ्यास आपोआप तयार होतो. चर्चा हा अभ्यासाचा मुक्त श्वास आहे. संवाद हे अभ्यासाचे निवासस्थान आहे. ग्रंथालय हे अभ्यासाचे माहेरघर आहे. हे भाऊंना पक्के ठाऊक असल्यामुळे त्यांनी गांधीतीर्थ, अनुभूती शाळा व प्रत्येक ठिकाणी ग्रंथालय उभे केले. त्यांच्या टेबलावर कायम पुस्तकांचा ढीगारा पडलेला असायचा. निरनिराळ्या भाषेतले असंख्य प्रकारचे शब्दकोश त्यांनी जमा केले होते. अधिक भाषा येणे हे सांस्कृतिक श्रीमंतीचे लक्षण व खजिना असल्यासारखे आहे अशी त्यांची भावना होती. त्यामुळेच ते शब्दप्रभूही बनले होते आणि कोंदणात अचूक बसतील असे शब्द ते बोलतांना व लिहिताना वापरत होते.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात काय घडामोडी चालू आहेत याची भाऊंना खडानखडा माहिती असायची. त्यांच्या या माहितीची विद्यापीठात काम करताना मला खूप मदत झाली. डोक्यावर हात ठेवणारा असल्याशिवाय चांगले काम करणे जमत नाही. भाऊंनी माझ्या डोक्यावर चांगल्या कामासाठी कायम हात ठेवला. एक प्रसंग मला आठवतो. २ ऑटोबर, २००६ रोजी आम्ही विद्यापीठाच्या टेकडीवर महात्मा गांधींचा जो पुतळा बसविला होता त्याचे आणि गांधी स्मारकाचे (जीआरएफ) उद्घाटन करायचे ठरले होते. पण आदल्या दिवशी प्रचंड पाऊस झाला, समारंभ होऊ शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. आम्ही सगळे आता कार्यक्रम होणार की नाही या चिंतेत होतो. भवरलाल भाऊंनी ६ ऑक्टोबरच्या पहाटे चार वाजता भली मोठी माणसांची फौज विद्यापीठातल्या त्या टेकडीवर पाठविली. त्यांनी मुरुम टाकला. चिखल बाजूला केला. पाणी काढले आणि समारंभ करता येईल अशी व्यवस्था केली. सकाळी दहा वाजता समारंभ व्यवस्थितपणे पार पडला. टेकडी अस्ताव्यस्त होती तिचे ते रूप पाहून भाऊ म्हणाले, 'टेकडीवर झाडे लावली पाहिजेत.' मी म्हणालो, 'लावू ना पुढे.' त्यावर भाऊ म्हणाले, मी झाडे लावली तर चालतील का? " मी काही बोललो नाही. पुढच्या चार-पाच दिवसात भाऊंनी झाडे व माणसे पाठवून टेकडीवर झाडे लावून टाकली. असे प्रेम भाऊंनी आम्हांला दिल्यामुळे आम्ही जन्मभर त्यांच्या ऋणात आहोत !

# भाऊंच्या चिठ्ठीत गांधीतीर्थची बीजे

**डॉ. एन. के. ठाकरे**
पहिले कुलगुरू - कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

धुळे जिल्ह्यातील मोराणे हे माझे जन्मगाव. २२ एप्रिल १९३८ चा माझा जन्म. १९५५ साली अकरावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकायला गेलो. दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीत मोराणे गावी येत असे पण तसा फारसा संबंध कधी



माझा खानदेशशी राहिला नाही. १४ ऑगस्ट १९९० रोजी माझी जळगावात स्थापन झालेल्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून नेमणूक झाली. १९ ऑगस्ट, १९९० रोजी कुलगुरुपदाची सूत्रे हाती घेण्यासाठी मी प्रथम जळगावला आलो, तेंव्हा विद्यापीठाचे काहीही नामोनिशाण येथे नव्हते.



*कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील कार्यक्रमाप्रसंगी डॉ. एन.के. ठाकरे व भवरलालभाऊ*



ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. भालचंद्र नेमाडे यांचा सपत्नीक गौरवपत्र प्रदान करताना भवरलाल जैन आणि डॉ. एन. के. ठाकरे सोबत उपस्थित रमेश व्ही. पाटील, डॉ. उल्हास पाटील, रक्षा खडसे, एकनाथराव खडसे, हरिभाऊ जावळे आणि उपस्थित इतर मान्यवर

विद्यापीठासाठी जागाही मिळालेली नव्हती. ती शोधायची होती. पुणे विद्यापीठाने १५ वर्षे वापरलेली एक गाडी, रेमिंग्टन कंपनीचा एक टाइपरायटर आणि दोन लाख रुपयांचा चेक माझ्यासोबत दिला होता. पूर्वी जळगाव हे पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येत होते. म्हणून त्यांनी ही मदत केली होती. जळगावात त्यावेळी सर्वेसर्वा श्री. सुरेशदादा जैन हेच होते. तेच नगराध्यक्ष होते आणि आमदारही होते. मी जळगावला आल्यानंतर पहिल्या दिवशी सुरेशदादांनी मला त्यांच्या घरी नेले. स्वागत केले. चहापाणी झाले. पण माझी राहण्याची सोय नव्हती. त्यामुळे पहिल्या दिवशी मी गाडीतच झोपलो. पण नंतर भवरलाल जैन यांनी माझी व्यवस्था करण्यासाठी 'शामकांत देशपांडे' नावाचे एक ग्रहस्थ माझ्याकडे पाठविले. ते भवरलालजींचे अत्यंत जवळचे सहकारी व सी.अे. होते आणि एका कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. २० ऑगस्टला जेव्हा प्रा. देशपांडे माझ्याकडे आले तेंव्हा मला प्रश्न पडला. भवरलाल जैन यांची आणि माझी काहीही ओळखपाळख नाही. आम्ही कधी एकमेकांना भेटलेलोही नाही. मग ते माझी इतकी काळजी घेऊन व्यवस्था का करताहेत ? अर्थात मी त्यावेळी माझ्या मनाची समजूत घालायची म्हणून असे मनाशीच म्हणालो की, "जळगावात भवरलालजींचे वास्तव्य आहे, उद्योगधंदा आहे. गावात नव्याने विद्यापीठ आणि शैक्षणिक सुविधा उभी राहते आहे म्हणून त्यांना आनंद झाला असेल. या आनंदाप्रित्यर्थ माझी ते काळजी घेत असतील. असे मानून मी माझ्या मनाची समजूत घातली. एक-दोन दिवस जळगावात राहून शिक्षण खात्याच्या सचिव कुमुद बन्सल यांना भेटण्यासाठी मी मुंबईला गेलो. मुंबईहून रेल्वेने परत जळगावाला येताना प्रथम श्रेणीच्या वातानुकूलित कुपेमध्ये साधारणपणे माझ्याच वयाचे एक गृहस्थ होते. माझ्यापेक्षा ५-६ महिन्यांनी थोडे मोठे असतील. पण आम्ही एकमेकांना ओळखत नव्हतो. त्यामुळे गाडीत काही संवाद झाला नाही. नंतर काही दिवसांनी मला कळाले की, गाडीतले ते गृहस्थ म्हणजे जैन इरिगेशनचे मालक व संस्थापक अध्यक्ष श्री. भवरलाल जैन होते. आम्ही दोघांनी एका डब्यातून मुंबई ते जळगाव असा प्रवास केला पण ओळख नसल्यामुळे आमचे काहीही बोलणे झाले नाही.

काही दिवसांनी भवरलालजींचा मला निरोप आला. मला तुम्हाला भेटायचे आहे. आमच्या कारखान्यात याल का? मी होकार दिला आणि संध्याकाळच्या वेळी त्यांना भेटायला कारखान्यात गेलो. त्यांनी मनापासून माझा सत्कार केला आणि रेल्वेच्या डब्यात एकत्र प्रवास करूनही आपण एकमेकांना ओळखू न शकल्याबद्दलची हळहळही व्यक्त केली. नंतर त्यांनी मला विचारले "विद्यापीठाची उभारणी करण्याचा काय प्लॅन आहे, काय काय करायचे ठरविले आहे?" त्यावर मी म्हणालो "अजून जागा शोधायची आहे. वेगळ्या पद्धतीचा अभ्यासक्रम तयार करून विद्यापीठाची उभारणी करावी असा माझा मानस आहे. कोणत्याही विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची कॉपी करायची

माझी इच्छा नाही?" त्यांना माझे बोलणे बहुधा खूप आवडले वा पटले असावे. 'वाह!' चांगली कल्पना आहे, एवढेच ते म्हणाले. भवरलाल भाऊंनी मोठ्या प्रमाणात कारखान्यात बांधकामे केलेली असल्यामुळे त्यांना बांधकामासंबंधी प्रचंड माहिती होती. त्यांच्या डोक्यातही अनेक कल्पना होत्या. त्यासंबंधीच्या सूचनाही त्यांनी मला त्यावेळी केल्या. इतकेच नव्हे तर काही चांगल्या आर्किटेक्टची नावे ही सुचविली. पण राज्य सरकारने मुंबईतूनच हफीज कॉन्ट्रॅक्टरचे नाव दिल्यामुळे आम्हाला इतर आर्किटेक्टच्या नावाचा विचार करता आला नाही. पहिल्या भेटीत विद्यापीठ उभारणीच्या आराखड्यासंबंधी भवरलालजींबरोबर प्राथमिक स्वरूपाचे बरेच बोलणे झाले.

योगायोगाने काही दिवसानंतर जळगावचे तत्कालिन जिल्हाधिकारी असलेले श्री. विद्याधर कानडे यांच्या मदतीने आम्हाला विद्यापीठ उभारणीसाठी भवरलालजींच्या बांभोरी येथील कारखान्याशेजारचीच जागा मिळाली. आम्ही १९०० एकर जागा मागितली होती.पण प्रत्यक्षात ६५० एकर जागा मिळाली. जागेसंबंधीचा निर्णय करण्यासाठी मुख्यमंत्री शरद पवार यांनी त्यांच्या दालनात मुंबईला बैठक बोलावली. श्री. विलासराव देशमुख हे शिक्षणमंत्री होते. शरद पवार साहेब हे महाराष्ट्राला मिळालेले मोठे देणे आहे हे माझ्या त्यावेळी लक्षात आले. शिक्षण सचिव कुमुद बन्सल, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी सगळे बैठकसाठी आले. पण विलासराव देशमुख आलेच नाहीत. शेवटी पवार साहेबांनी स्वतः त्यांना फोन करून बोलावून घेतले. तेव्हा आल्यावर ते म्हणाले," दोन जिल्ह्यांचे तर हे विद्यापीठ आहे. त्याला कशाला एवढी जागा पाहिजे" शेवटी पवार साहेब म्हणाले " अहो दोन्ही सभागृहांनी विद्यापीठ स्थापनेचा ठराव संमत केला आहे. त्यामुळे विद्यापीठाला जागा द्यावीच लागेल." नाही.. हो... करता शेवटी ६५० एकर जागा माझ्या ताब्यात देण्याचा निर्णय झाला. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे देशात पहिल्यांदा असे घडले असेल की, जागा कुलगुरुंच्या ताब्यात देऊन त्यांच्या कागदपत्रांवर सह्या घेतल्या. अन्यथा पूर्वी सर्व जागा रजिस्ट्रारच्या नावावर देऊन त्यांच्या सह्या घेत होते. ही जागा मिळण्याच्या संदर्भातही भवरलालजींनी पडद्यामागे राहून खूप खटपटी केल्या होत्या. हे नंतर मला कळले. त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यापीठाला जागा मिळणे थोडे सुकर झाले. कारण त्यांचे प्रशासनातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी व शरद पवार यांच्याशी फार चांगले संबंध होते. त्यामुळे ही जागा देण्यासाठी मंत्र्यांचा विरोध असला तरी ते पॉझिटीव्ह होते.

आता प्रत्यक्ष इमारतींची उभारणी करण्याचा विषय पुढे चर्चेला आला. सरकारकडून पैसे मिळत नसल्यामुळे बांधकाम सुरू करता येत नव्हते. एके दिवशी भवरलाल जैन यांच्याशी या इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीसंबंधी चर्चा चालू होती. पैशाची अडचण मी त्यांना सांगितली. त्यावर त्यांनी फार मोठमोठ्या व उंच टोलेजंग इमारती उभारण्यापेक्षा महात्मा गांधीजींच्या आश्रमात जशा कुटीर असायच्या त्या पद्धतीने वर्ग उभे करावेत अशी सूचना केली. मी देखील त्यांच्या सूचनेला माझा होकार दिला



*उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील गांधी स्मारक येथील उद्घाटन प्रसंगी अमरीशभाई पटेल, डॉ. एस. एफ. पाटील, डॉ. एन. के. ठाकरे, सुरेशदादा जैन, डॉ. के. बी. पाटील आणि इतर मान्यवर*

# भवरलाल भाऊ - विवेकी ज्ञानसाधक !

जळगावच्या जैन हिल्सवर गेलो आणि भवरलाल भाऊंना भेटलो व त्यांनी प्रचंड मेहनतीने व कल्पकतेने उभा केलेला त्यांचा निसर्ग पाहिला की माझ्या मनात अनेक विचारांची दाटी व्हायची. अनेक गोष्टी उफाळून यायच्या आणि मग मनातल्या मनात भाऊंवर कौतुकाची स्तुतीसुमने उधळायला प्रारंभ व्हायचा. वास्तविक भौतिक शास्त्राच्या मते देह आणि मन हे एकच आहेत. जड व शक्ती हेही एक आहेत. जडातील परमाणू संचयात शक्ती असते. जड वस्तूंचे विचारात आणि कल्पनात मानव रूपांतर करतो. यावरून असे सिद्ध होते की, वस्तु व मन म्हणजेच देह व मन ही अभेद रूपे आहेत. म्हणजेच मनावर ताबा मिळविण्यासाठी मनोविकारांना गती देणा-या नियमांचे ज्ञान आणि त्यांचे नियमन आवश्यक असते. हे नियमन करण्यात भाऊंचा हातखंडा होता. त्यामुळे मला असे सतत वाटे की, विवेकी लोकांनाच निसर्ग ज्ञानदान करीत असतो. लोकांच्यातले दोष, त्यांच्या मर्यादा, यांची जाणीव स्वच्छपणे निसर्ग देत असतो.

भाऊंनी तर स्वतःचा निसर्ग उभा केलेला असल्यामुळे विवेक त्यांच्या अंकित होता. एका अर्थाने ते विवेक सम्राट होते. विवेक म्हणजे बुद्धीचे पृथ:करण करण्याची शक्ती. याला अध्यात्मज्ञानात बुद्धीगम्य ज्ञान म्हणतात. असे ज्ञान भावनेत परावर्तित झाल्यावर ते कार्यान्वित होते. म्हणून ज्ञान-इच्छा-क्रिया असे ज्ञानाचे महत्वाचे टप्पे भारतीय दर्शनकार जैसे मानतात तसे पाश्चात्य दर्शनकार ही मानतात. बुद्धिमत्ता सर्वस्वी संपूर्ण प्रक्रिया कधीही ठरवू शकत नाही. बुद्धीला नीती आणि श्रद्धेची जोड असेल तर ते ज्ञान पवित्र ठरते. ज्ञान याचा अर्थ 'आहे ती वस्तुस्थिती' जाणणे किंवा 'का' या प्रश्नाचा शोध घेण्याची प्रक्रिया सतत चालू ठेवणे. मोठे भाऊ ही प्रक्रिया जाणीवपूर्वक चालू ठेवत होते एवढेच नव्हे तर, सृष्टीतल्या घडामोडींचा ते सूक्ष्म अभ्यासही करीत होते. घडामोडींमध्ये त्यांना संगती दिसाली, तर त्या संगतीतून माणसाला शिकण्यासारखे बरेच काही आहे असे त्यांना जाणवत असे. त्यामुळेच ते सातत्याने सगळ्यांना सांगत असत 'ज्ञानदाना सारखे पवित्र या जगात दुसरे काहीही नाही' भौतिक जगात ज्ञान हे सर्वश्रेषच आहे. किंबहुना ते विश्वाचे चैतन्य आहे. ज्ञाना इतके उत्तम या विश्वात दुसरे नाही. ज्याप्रमाणे सूर्या विश्वाचा प्रकाशक आहे त्याप्रमाणे ज्ञान हा माणसाचा प्रकाशक आहे. याची अचूक जाणीव असलेले भवरालालजी अखेरपर्यंत ज्ञान साधक राहिले.



पांढरा कांदा बिजोत्पादन क्षेत्रातील कांद्याच्या फुलोऱ्याचे निरीक्षण करतांना भाऊ


२००३ मध्ये करारावर सही करताना भवरलाल जैन, जेम्स मेल्सा आणि कुलगुरू डॉ. आर. एस. माळी. त्यावेळी उपस्थित रमेश कंवर, अरुण सोमानी, अशोक जैन, डॉ. ढाके, डॉ. बाला, ना.धों. महानोर, डॉ. एन. के. ठाकरे आणि इतर उपस्थित मान्यवर

आणि अशी स्ट्रक्चर्स आपण शोधूया असे ठरविले. पण सरकारने हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांना काम दिल्यामुळे भाऊंचा गांधी कुटीरचा विचार मागे पडला.

खानदेशातला मुख्य व्यवसाय शेती आणि शेती हाच भाऊंच्या कामाचा, उद्योगाचा विषय. आमच्याही घराण्यात शेती हाच परंपरागत व्यवसाय, त्यामुळे शेतीच्या विषयावर भाऊं-समवेत सतत चर्चा होत असे. ते शेतकऱ्यांच्या उन्नती व प्रगतीचा सतत विचार करायचे. त्यासाठी धडपडायचे, संशोधन व नवनिर्मिती करायचे. त्यामुळे सातत्याने ते कामातच असायचे. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी व त्यांनी नवीन ज्ञान, तंत्रज्ञान आत्मसात करावे यासाठी त्यांचा जीव सतत तळमळत असे. तळमळ म्हणजे साधकाची सत्वपरीक्षा. ती जितकी उत्कट, तितकी आत्मप्रकाशाची जाणीव लख्ख असते. याचे दर्शन मला भाऊंच्या तळमळीत दिसून आले. भाऊंची तळमळ समाजासाठी असल्यामुळे ती उच्च कोटीची होती. जगाला पुढे नेणारी होती आणि विचार करण्यासाठी नवे सामर्थ्य देणारी होती. भाऊंनी जैनहिल्सवर स्वतःचा निसर्ग उभा करण्याचे ठरविले होते. ती कल्पना सतत त्यांच्या मनात रुंजी घालत होती. तसेच निसर्ग, झाडे, वनस्पती, लता, वेली लावून विद्यापीठात उभे करावे असे ते आवर्जून मला सातत्याने सांगत होते. झाडे कोणत्या प्रकारची लावावीत यासंबंधीही त्यांनी खूप विचार केला होता. तोच विचार माझ्या मनावर बिंबविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे मला कुलगुरू पदाची जी तीन-तीन वर्षाची दोन टर्म मिळाली त्या सहा वर्षात मी विद्यापीठाच्या परिसरात व डोंगर उतारावर जवळपास सहा ते सात लाख झाडे लावली. ही झाडे लावून निसर्ग उभा करण्याची प्रेरणा श्री. भवरलालजींची होती.

विद्यापीठाला जी ६५० एकर जागा मिळाली होती त्यात सपाट जागा फारशी नव्हतीच. सगळा डोंगराळ चढ-उताराचा भाग होता. आर्किटेक्टच्या मदतीने आम्ही जेव्हा पुढच्या २५-५० वर्षांचा मास्टर प्लॅन तयार करायला घेतला तेंव्हाही भवरलाल भाऊंनी त्यांच्या मनातील कल्पना माझ्या गळी उतरविल्या. विशेषतः रस्ते कसे करावेत याबाबतचा त्यांचा अनुभव मोठा व मुरब्बी होता. त्यामुळे विद्यापीठातले रस्ते करताना त्यांच्या ज्ञान व अनुभवाचा आम्हाला चांगला फायदा झाला. विद्यापीठाचे काम म्हणजे आपले स्वतःचे काम आहे असे समजून ते स्वतः या कामात लक्ष घालू लागले. नुसती विचारपूस करून किंवा मार्गदर्शन करून ते थांबले नाहीत. त्यांनी स्वतःच्या कंपनीतली माणसे आणि जेसीबी यंत्र रस्ते करण्यासाठी विद्यापीठात पाठविले. हे सर्व काम त्यांनी मोफत करून दिले. आमच्याकडून कधीही कसली अपेक्षा केली नाही. निरपेक्ष भावनेने काम करणे हाच त्यांचा धर्म होता. आपल्या गावात उभी राहात असलेली एक शिक्षणसंस्था वाढावी, मोठी व्हावी, मजबुतीने चिरंतन उभी राहावी आणि त्यातून राष्ट्राच्या उभारणीसाठी आवश्यक असलेले ध्येयवादी युवक-युवती घडावेत हीच त्यांची तळमळ व आस होती. त्यामुळेच झाडे लावणे, रस्ते तयार करणे, इमारतींचे स्ट्रक्चर ठरविणे या सर्व कामात त्यांनी मनापासून लक्ष घातले व आम्हाला वेळोवेळी मदत, मार्गदर्शन केले. झाडे लावताना ती कशी लावावीत, त्यासाठी खड्डे कसे खोदावेत, ते काय आकाराचे असावेत,

त्यात खत-माती कशी भरावी याचे नुसते प्रात्यक्षिक दाखवून थांबले नाहीत. त्यांनी स्वतःचे कर्मचारी पाठवून त्यांच्यामार्फत आम्हांला खड्डे खोदून दिले आणि झाडेही लावून दिली. सामाजिक वनीकरण विभागाने आम्हांला लावण्यासाठी रोपे दिली होती. पण तीही कमी पडल्यावर. भवरलाल भाऊंनी स्वतः निवडक व दर्जेदार रोपे विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर लावण्यासाठी पाठविली. आमचा विद्यापीठाचा सगळा परिसर हा रखरखीत प्रदेश होता. जळगावात त्यावेळी पडणा-या पावसाचे प्रमाणही कमी होते. एक प्रकारे हा सगळा अवर्षण प्रवणाचा भाग होता. त्यामुळे पावसाळ्याच्या हंगामाव्यतिरीक्त इतर काळात झाडांना पाणी नैसर्गिकरीत्या उपलब्ध होणे अशक्य होते. अशा वेळी झाडे कशी जगतील हा प्रश्न भाऊंच्या मनात आला. यांनी तो मला बोलूनही दाखविला. मग भाऊ म्हणाले, आपण कमी पाण्यात जगतील पण झटपट वाढून जास्त सावली देतील अशी झाडे लावूयात. त्याप्रमाणे नियोजन केले.

### पहिला पदवीदान समारंभ

७ सप्टेंबर १९९३ रोजी विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ झाला. हा समारंभ करण्यासाठी विद्यापीठात हॉल बांधून झालेला नव्हता. त्यामुळे पदवीदान समारंभ जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात घ्यावा लागला. या पहिल्या पदवीदान समारंभाला महाराष्ट्राचे तत्कालिन राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर हे उपस्थित होते. पण स्नातकांना उद्देशून बीजभाषण केले ते थोर गांधीवादी विचारवंत न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी. या पदवीदान समारंभाला जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अरुणभाई गुजराथी व श्री. भवरलाल जैन हे उपस्थित होते. ते व्यासपीठाच्या समोर बसले होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाषण करताना न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी " यावर्षी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीला १२५ वर्षे पूर्ण होतील. गांधीजींचा विचार आज जगभर वेगाने पसरतो आहे. हा विचार चिरंतन ठेवून तो वाढीला लावण्यासाठी विद्यापीठानेही हातभार लावला पाहिजे. त्यामुळे विद्यापीठाने हा विचार तेवत राहील यासाठी महात्मा गांधीजींच्या नावाने अध्यासन तयार करून त्यांच्या विचारांचे शिक्षण मुलांना देत राहावे अशा पध्दतीने अभ्यासक्रम तयार करावा" असे सुचविले.

११ सप्टेंबर १९९३ रोजी विद्यापीठातील बांधकामांचा शुभारंभ करण्यात आला. या बांधकामाच्या भूमीपूजन समारंभाला मुख्यमंत्री शरद पवार आले होते. त्यावेळी भवरलाल जैन यांनी एक लेखी चिठ्ठी मला पाठविली. त्या चिठीत लिहिले होते “महात्मा गांधीजींच्या विचारांचे अध्यासन करण्यासंबंधी न्या. धर्माधिकारी यांनी भाषणातून जी सूचना केली आहे ती खूप मौलिक आहे. तिची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आपण पाऊले टाकूया. त्यासाठी विद्यापीठाला भरीव आर्थिक मदत करण्याची माझी तयारी आहे. विद्यापीठाने ५० लाखापेक्षा अधिक खर्च असलेले गांधी अध्यासन व गांधीजींचे स्मारक तयार करण्यासंबंधीचा आराखडा तयार करावा, किती मदत पाहिजे तो आकडा मला कळवावा. मी सर्वतोपरी मदत करीन!” मला आज विचार करताना असे मनापासून वाटते की, भाऊंच्या मनात म.




*जैन हिल्स येथील भाऊंची सृष्टी येथे मोठ्याभाऊंच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित नक्षत्र गार्डनच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. एन. के. ठाकरे*

गांधींबद्दल प्रचंड प्रेम व आदर होता. तसेच प्रेम व आदर मलाही असल्यामुळे आमच्या विचारांची नाळ बरोबर जुळली आणि पुढील काळात जळगावच्या जैन हिल्सवर भाऊंनी जे गांधीजींचे जगात कुठेही नाही अशा प्रकारचे जे भव्यदिव्य स्मारक व ग्रंथालय 'गांधी तीर्थ' च्या रूपाने उभे केले. त्याची बीजे या चिठ्ठीत होती. या चिठ्ठीतून गांधीतीर्थचा जन्म झाला असे मला वाटते.

वैयक्तिक पातळीवर विचारांची नाळ जुळल्यामुळे भाऊ मला जैन हिल्सवर कुठलाही कार्यक्रम असला तरी बोलवायचे. थोडा रिकामा वेळ असेल तर संध्याकाळी गप्पा मारायला,सोबत जेवायला बोलवायचे. कितीतरी तासनतास आम्ही गप्पा मारल्या आणि त्यातून मोठी वैचारिक देवाणघेवाण झाली. असेच एकदा बोलत असताना भाऊंनी मला त्यांच्या मनात कृषी महाविद्यालय आणि खासगी कृषी विद्यापीठ काढावे असा विचार घोळत असल्याचे सांगितले. बरीच चर्चा या विषयावर झाल्यानंतर यासाठी एक कमिटी करण्याचे ठरले आणि या कमिटीवर सदस्य म्हणून मला घेण्यात आले. कृषी महाविद्यालय आणि विद्यापीठ काढण्याचा विचार नंतर भाऊंच्या मनातून बारगळला. त्यांना भविष्यातले अनेक प्रश्न समोर दिसू लागले. विद्यमान शाळा, महाविद्यालये व विद्यापीठात घडणारे अनेक प्रसंग व त्याच्या येणाऱ्या बातम्या ते ऐकत व पाहात होते. त्यामुळे त्यांनी या संस्था काढायचा निर्णय रद्द केला. त्याबाबत एक दिवस माझ्याशी बोलले आणि मनात याबाबत असलेली भीतीही त्यांनी बोलून दाखविली. १९९६ साली माझी कुलगुरूपदाची दुसरी टर्मही संपली आणि मी जळगाव सोडले. पण त्यानंतरही काही ना काही कार्यक्रमांच्या निमिताने भवरलाल भाऊ मला बोलवत राहिले आणि आमची भेट होत राहिली. गांधीतीर्थचे उद्घाटन राष्ट्रपती महामहिम सौ. प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते झाले. या समारंभाला भाऊंनी मला बोलाविले होते. व्यासपीठावर न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी देखील उपस्थित होते. समारंभ संपल्यानंतर न्या. धर्माधिकारी यांनी मला फोन करून माझे अभिनंदन केले. तेव्हां मी विचारले कशासाठी? तेव्हा धर्माधिकारी म्हणाले, या गांधीतीर्थ च्या उभारणीसाठी निमित्त तुम्ही आहात. विद्यापीठातील तुमच्या पदवीदान समारंभामुळे हे घडून आले. मला खूप समाधान वाटले. भाऊंचे माझ्यावर नितांत प्रेम होते. ते मी रोज अनुभवत होतो. माझ्या मुलीचे लग्न ठरले. या लग्नाला प्रकृतीच्या कारणास्तव भाऊ येऊ शकत नव्हते. त्यांनी आम्हांला घरी जेवायला (केळवणाला - गडींगनराला) बोलाविले. मी, माझी पत्नी व मुलगी असे तिघेजण भाऊंच्या घरी जेवायला गेलो. त्यानंतर मी मोराणे गावात एक बंद पडलेली शाळा चालवायला घेतली. भाऊंनी एक फोर्स मोटर कंपनीचा टेम्पो आम्हाला मुलांची वाहतूक करायासाठी स्वतःहून पाठवून दिला. भाऊंची मदत करण्याची वृत्ती व दानत खूप मोठी होती आणि विशेष म्हणजे या मदतीचा उल्लेख ते कधी करीत नसत. उजव्या हाताने केलेली मदत डाव्या हातालाही कळू नये अशी निस्वार्थ, प्रसिद्धी पराङ्मुख वृत्तीची जी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी मूठभर माणसे आहेत त्यात भवरलालजींचा समावेश आहे. अश्या थोर व्यक्तीच्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतीला मी विनम्र अभिवादन करतो.



वाकोद येथील शाळेच्या नुतन वास्तु उदघाटन प्रसंगी सुरेशदादा जैन, भवरलाल जैन, डॉ.एन.के. ठाकरे, ना.धों. महानोर, दलुभाऊ जैन, कांतीलाल जैन, अशोक जैन

# भाऊंचे ठिबक तंत्रज्ञान शेतकऱ्यांवर अगणित उपकार!

**वासुदेव लक्ष्मण झांबरे**
रा. बामणोद, ता. यावल, जि.जळगाव



आमच्या घरी बामणोद गावी ४० एकर जमीन होती. ती १९५५ सालापासून कसायला मी सुरुवात केली. तेव्हा शेतीला मोटेने पाणी देत होतो. दहा फुटावर पाणी होते. विहिर कायम पाण्याने भरलेली असायची. माझे वडील आणि मी मिळून जवळपास ४० वर्षे मोटेने शेताला पाणी दिले. १९६५-७० च्या सुमारास ऑईल इंजिन आली. मग इंजिनाने शेताला पाणी देणे सुरू केले. १०-१२ वर्षे इंजिन चालले. पाणी पातळी कमी झाली. विहिरी खोल गेल्या. १९७५ च्या नंतर वीजेवर चालणारे पंप व मोटारी आल्या आणि दहा फुटावरची पाणीपातळी दोनशे फुटावर गेली. पाणी कमी झाले. पिके कशी भिजवायची असा प्रश्न निर्माण झाला. मग बोअरवेल्स खोदायला सुरुवात केली. ७००-८०० फुटावरून पाण्याचा उपसा सुरू केला. सुरुवातीला मोटेवर भाजीपाला व थोडी केळी लावायचो. दुपारी बारा वाजेपर्यंत भाजीपाला काढला की भुसावळ, सावदा, फैजपूर, यावल व निरनिराळ्या गावातील आठवडा बाजारात हा भाजीपाला विकण्यासाठी न्यायचो. १९६०-६५ साली पहिल्यांदा केळी लावली. ४००-५०० खोडे लावायचो. त्यावेळी खरेदी करण्यासाठी व्यापारी नव्हते. केळीचा किरकोळ व्यायार चालत असे. वीजेवरती चालणा-या मोटारी आल्या. नंतर केळीची लागवड मी वाढविली. १०-१२ हजार खोडे दरवर्षी लावू लागलो. तेव्हा कंद लावायचो. पण रास फार चांगली पडत नव्हती.

आमची एक जमीन बर्डी, खारवट होती, चोपण झाली होती. त्यात फारशी काही पिके येत नव्हती. आम्ही त्या शेतात सागाची चार हजार झाडे लावली होती. आता या शेतात कोणती पिके घ्यावीत आणि ती कशी येतील हा आमच्यापुढे प्रश्न होता. त्यामुळे १९८६ साली भवरलाल भाऊंना मार्गदर्शनासाठी आम्ही शेतावर बोलाविले. भाऊंनी ही बर्डी जमीन सर्व पाहिल्यानंतर आम्हाला या पडीक जमिनीवर चार बाय चार फुटाचे खड्डे खोदून त्यात नदीतली माती, गाळ आणि शेणखत भरायला सांगितले. बारा हजार खड्डे आम्ही खोदले. भाऊंनी सांगितल्याप्रमाणे ते भरले आणि त्यामध्ये डाळींब व पेरूची लागवड केली. ही लागवड १० बाय १० फुटावर केली होती. तीस एकर क्षेत्रावर फळबाग लावली. पण झाडांना पाणी देताना रोज खूप धावपळ होऊ लागली. मग पुन्हा भवरलाल भाऊंचा सल्ला घेतला. तेव्हा त्यांनी नुकतेच ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान भारतात आणले होते. त्यांनी बागेला ठिबक संच बसवायला सांगितला आणि त्यासाठी लागणारे पाईप, नळ्या हे सर्व साहित्य बसविणाऱ्या माणसांसकट शेतावर पाठविले. आमची सगळी जमीन उंच सखोल होती. प्रवाही पद्धतीने व पाटाने पाणी देणे शक्यच नव्हते. त्यामुळे ठिबक सिंचनाचे हे तंत्रज्ञान आमच्यासाठी फारच उपयुक्त ठरले. जेम्स हार्डी कंपनीचे साहित्य भाऊंनी आम्हांला त्यावेळी दिले होते. भाऊंच्या माणसांनी शेतात

साहित्य बसवून पाणी काढून दिले. त्यामुळे पीक भिजवण्याची आमची समस्या मिटली. यावल रस्त्यावर आमचा २५ एकराचा एक मळा होता. तिथे पपई लावली होती. पपईचा चिक काढून तो 'एन्झोकेम' नावाच्या कंपनीला विकत होतो. पुढे या पपई बागेलाही ठिबक संच बसविला. मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू झाले आणि केळीपेक्षा त्यावेळी पपई पिकात जास्त पैसे मिळत होते.

देशातले किंवा परदेशातले कोणी मोठे पाहुणे आले की, भवरलाल भाऊ त्यांना आमच्या शेतावर घेऊन यायचे. ठिबक संचावरती पिके दाखवायचे. त्यावेळी मुंबईतील विल्सन कॉलेजच्या जवळ जिथे टिळक पुतळा आहे तिथे एक दुकान आम्ही भाड्याने घेतले होते. माजी शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी हे माझे चुलत मेहुणे. त्यांच्यामुळे दस्तुर नावाच्या एका पारशी कुटुंबाची ओळख झाली होती. त्यांच्या मदतीने आम्ही मुंबईत व परदेशात भाजी, फळे विकण्याचा धंदा सुरू केला होता. गिलके, दोडके, कारली, जांभळी वांगी आम्ही हॉलंडलाही पाठवित होतो. एक दिवशी भवरलाल भाऊ हे गुजरातचे अर्थमंत्री असलेल्या सनत मेहता यांना घेऊन बामणोदला आले. त्यांनी खराब व चोपण जमिनीवर आलेली उत्कृष्ट डाळिंब व सागाची झाडे पाहिली. ज्या क्षारपड, खारवट जमिनीवर गवतही उगविणे शक्य नाही तिथे तुम्ही डाळिंब कशी पिकविली असा प्रश्न सनत मेहता यांनी मला विचारला. मी सांगितले ही सगळी कृपा भवरलाल भाऊच्या ठिबक सिंचन तंत्रज्ञानाची आणि त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाची आहे. मग त्यांनी आनंद व्यक्त करून मोठ्या भाऊंचे अभिनंदन केले व असे काम आता आमच्या गुजरात राज्यातही करा असे सांगितले. त्या काळात पेरू बागेने आम्हांला खूप पैसे मिळवून दिले. सरदार नावाचा कलमी पेरू होता. एक किलोमध्ये दोन किंवा तीन पेरू बसायचे. दोन रुपये किलोचा भाव होता. पेरू नं. १चा होता. दहा माणसे एकावेळी पेरू विकायला बसायची. एक-दोन तासात सगळे पेरू संपायचे. ही सगळी किमया त्या ठिबक संचाची होती. त्या तंत्रज्ञानाचा खूप फायदा झाला. भवरलाल भाऊंनी देशात सर्वप्रथम हे ठिबक सिंचनाचे तंत्रज्ञान आणून शेतकऱ्यांवर अगणित उपकार केले आणि त्यांच्या या तंत्रज्ञानामुळेच शेती व फलोद्यान क्षेत्रात मोठी क्रांती होऊ शकली. हे आपल्याला मान्यच करावे लागेल.

भवरलाल भाऊंनी आम्हाला नुसते तंत्रज्ञान दिले नाही तर शेती मशागतीसाठी लागणारी रोटाव्हेटर, ट्रॅक्टर ही अवजारेही दिली आणि ते चालविणारे ड्रायव्हरही दिले. ही काम करणारी माणसे चार दिवस आमच्या शेतात राहिली. त्यांना भाऊंनी सूचना दिल्या होत्या, काम पूर्ण झाल्याशिवाय परत यायचे नाही. त्याप्रमाणे कर्मचारी काम पूर्ण करूनच गेले. भाऊंना नुसता माल विकण्यात कधीच रस नव्हता. त्या मालाचा शेतकरी कसा



*१९८८ साली जैन ठिबक सिंचनावर लावलेली डाळिंब बाग तत्कालिन मंत्री मधुकरराव चौधरी यांना दाखवितांना वासुदेव झांबरे व कृषीतज्ञ व्ही.बी. पाटील*

# भवरलालजी आणि भरीत पार्टी



आमचे बामणोद हे गाव भरीताच्या वांग्यांसाठी प्रसिद्ध आहे. गावातल्या माती आणि पाण्यामुळे वाग्यांना एक वेगळीच चव आहे. त्यामुळे आता देशभर ही भरताची वांगी प्रसिद्ध झाली आहेत. शिवाय हे भरीत करण्याची देखील एक वेगळी पध्दत आहे. कपाशीच्या तुराट्यांवर जाळ करून त्यांवर ही वांगी भाजली जातात. भाजण्यापूर्वी त्यांना छिद्रे पाडून त्यात गोडेतेल सोडले जाते. नंतर भाजलेल्या वांग्यांना चुरून त्यात कांद्याची पात लांब हिरव्या मिरच्या, शेंगदाणे व खोब-याचे तुकडे टाकून ते भरीत परतले जाते. भरीता बरोबर खाण्यासाठी कळणाच्या (उडीद पीठ, बाजरी किंवा ज्वारी पीठात मिसळणे) भाकरी किंवा पूऱ्या केल्या जातात. याला खानदेशात 'भरीत पार्टी' म्हणतात. नोव्हेंबर ते फेब्रुवारी या काळात या भरीत पार्ट्यांना प्रचंड उधाण येते. भवरलाल भाऊ अनेक देशी-विदेशी पाहुण्यांना घेऊन आमच्या बामणोदच्या शेतावर भरीतपार्टीसाठी यायचे. विशेष म्हणजे या भरीतसाठी लागणा-या हिरव्या मिरच्या, कोथिंबीर, कांद्यांची पात हे सगळे आम्ही शेतातच लावलेले असायचे. त्यामुळे ताजा भाजीपाला काढून तो लगेच या भरीतामध्ये वापरायची. शिवाय त्याकाळी औषधे व रासायनिक खतांचा वापर नव्हता. त्यामुळे भरीताची चव अप्रतिम असे. पंधरा दिवसातून एकदा तरी भरीत पार्टी व्हायचीच. आता या सगळ्या जुन्या आठवणी उफाळून आल्यानंतर एकच प्रश्न वारंवार मनात येतो, 'भाऊ परत कधी पाहुणे घेऊन भरीत पार्टीसाठी येतील का' ? आम्ही त्यांची आतुरतेने वाट पाहतो आहोत !





१९८९ मध्ये गुजरातचे अर्थमंत्री सनद मेहता यांना जैन ठिबक सिंचनावर लावलेली बाग दाखवितांना वासुदेव झांबरे सोबत भवरलालभाऊ, आर.बी.जैन व एस.व्ही. पाटील आदी

वापर करतो, त्याला ते वापरणे जमते की नाही हे स्वतः भाऊ शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन पाहायचे.

यावल तालुक्यातल्या शेतीवर येऊन भाऊंनी आम्हांला पाण्याचा पीएच कसा तपासायचा, ठिबक संच, फिल्टर, ड्रीपर कसा स्वच्छ करायचा, ॲसिड ट्रीटमेंट कशी करायची हे तंत्र शिकविले. महिन्यातून एकदा हे सगळे साहित्य साफ, स्वच्छ केलेच पाहिजे हा दंडक त्यांनी आम्हाला घालून दिला. त्यामुळे जैनचे दर्जेदार व मोठ्या गुणवत्तेचे असलेले हे साहित्य आमच्याकडे आजही वर्षानुवर्षे टिकून आहे. भाऊंच्या या ठिबक तंत्राच्या देणगीमुळे आमचे दांडाने व प्रवाही पद्धतीने पिकांना पाणी देण्याचे कायमचे बंद झाले.

## केळीचा घड ४० किलोचा

ठिबक संच केळीच्या झाडाला बसविल्यानंतर आमची तापी नदीच्या काठाला जी सुपीक काळीभोर जमीन होती तिथे एकेका झाडाला ४० किलोचा घड पडू लागला. बसराई जातीची केळी तेव्हा लावली होती. हा घड वाहून आणायला दोन माणसे लागायची. एका माणसाला घड उचलत नव्हता. आमोदा गावातून जे पाणी आमच्या शेतात यायचे ते सोबत गाळ वाहून आणायचे. त्यामुळे जमीन एकदम सुपीक गाळाची बनली होती. मोठ्या भाऊंनी अफगाणिस्तानचे काही शेतकरीही पीक दाखविण्यासाठी आमच्या शेतावर आणले होते. भाऊंनी ठिबक संचाबरोबरच व्हेंच्युरीमधून खते कशी सोडायची (फर्टिगेशन करणे) आणि त्यांचा फायदा किती आहे हे आम्हांला समजून सांगितले, त्याचेही शिक्षण दिले. ठिबक सिंचन तंत्रज्ञांनाची ही उपयुक्तता पाहिल्यानंतर आम्ही श्री. मधुकरराव चौधरी यांना भारताच्या अर्थमंत्र्यांना ठिबकच्या सबसिडीसाठी पत्र लिहिण्यास सांगितले. आम्ही शेतकऱ्यांनी व केळीची विक्री करणाऱ्या श्रीराम शेतकरी संघानेही सरकारला ठिबकच्या अनुदानासाठी पत्रे लिहिली. हिंगोणा गावाजवळ मोर नावाचे धरण झाल्यानंतर १९९७ सालापासून आमच्या गावातले पाणी कमी झाले. त्यामुळे काही शेतकऱ्यांनी १२-१४ किलोमीटरच्या पाईपलाईन करून बाहेरून सिंचनासाठी पाणी आणले. या पाण्यासाठी लागणारे दर्जेदार पीव्हीसी पाईपही भवरलाल जैन यांनीच उपलब्ध करून दिले होते. शेतकऱ्यांच्या सगळ्या गरजा व अडी-अडचणी समजून घेऊन त्यांची पूर्तता त्वरीत करणारे भाऊ हे शेतकऱ्यासाठी देवदूतच होते. त्यांनी आयुष्यभर शेती आणि शेतकऱ्याच्या कल्याणाचीच चिंता वाहिली. भाऊंच्या मार्गदर्शनामुळे व त्यांनी पुरविलेल्या तंत्रज्ञानामुळे जी आधुनिक पद्धतीची शेती आमची उभी राहिली ती पाहण्यासाठी देश-विदेशातून असंख्य नामांकित व्यक्ती येऊ लागल्या. त्या व्यक्तींनी जे अभिप्राय दिले ते एका वहीत आम्ही लिहून घेतले होते. एकदा मी आणि डॉ. के.बी. पाटील भाऊंच्या गावातील बंगल्यावर ती वही देण्यासाठी गेलो होतो. तेव्हा दलुभाऊही तिथे उपस्थित होते. मोठ्या भाऊंनी आम्हाला संध्याकाळी घरी जेवायला दिले. भाऊंच्या प्रेम व मार्गदर्शनामुळेच आमच्या कुटुंबाची एवढी प्रचंड भरभराट झाली आहे. त्यांचे आमच्या कुटुंबावरील उपकार आम्ही आयुष्यभर विसरू शकत नाही.

# स्नेहाचा शिवार

## एकनाथ बडगुजर आणि श्रद्धेय मोठ्याभाऊंची आठवण

### श्रद्धेय मोठ्याभाऊंच्या जन्म दिनाच्या औचित्याने स्मरण...

काही नाती खूप मोलाची ठरतात. खरे तर ती रक्ताची नसतात, पण तरीही रक्ताच्या नात्या इतकीच मोलाची ठरतात. मनाच्या गाभ्यात खोलवर अशी काही नाती रुजलेली असतात हे तितकेच खरे. शेतकरी ग्राहक आणि उद्योजक असा कोरडा व्यावसायिक नात्यांचा नव्हे तर स्नेहाचा धागा असलेल्या एका नात्याची ही सत्यकथा आहे. जैन इरिगेशनचे संस्थापक, श्रद्धेय भवरलालजी जैन तथा मोठेभाऊ आणि कान्हदेशातील जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील कुऱ्हे पानाचे येथील प्रयोगशील प्रगतशील शेतकरी एकनाथ राजाराम बडगुजर यांच्याविषयीची ही आठवण. केवळ एका शेतकऱ्याची आणि एका उद्योजकाची नाही, तर दोन विचारशील मनांची, दोन संवेदनशील व्यक्तिमत्त्वांची आहे.




१९७९ साल प्रत्यक्ष वरवर साधा मात्र आतून गहिऱ्या सच्चाईने भारावलेला. एकनाथ बडगुजर यांना शेतीसाठी फोर्ड ट्रॅक्टर खरेदी करायचा होता. वडील राजाराम बडगुजर यांनी सवलतीसाठी मोठ्याभाऊंशी बोलण्याचे काम एकनाथ यांच्यावर सोपवले. मोठ्याभाऊंकडे फोर्ड ट्रॅक्टरची डिलरशीप होती. मोठ्याभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाने एकनाथ यांना त्या पहिल्या भेटीतच भुरळ घातली. शेतकऱ्यांसाठी अंतःकरणात असलेली आपुलकी, त्यांच्या बोलण्यात असलेली सच्चाई आणि त्यांच्या विचारांत असलेली दूरदृष्टी हे सर्व अनुभवताना एकनाथ बडगुजर यांना वाटले की, श्रद्धेय मोठेभाऊ केवळ उद्योगपती नाहीत, तर शेतकऱ्यांचे खरे मार्गदर्शक आणि महानायक आहेत. ते म्हणतात, त्यावेळी डीलरच्या डिस्काऊंटमधून काही पैसे माझ्या शब्दाखातर कमी करून दिले होते. त्यावेळी १२ फूटची ट्रॉली, नांगर, ट्रीलर या चार वस्तू त्यावेळी केवळ ९५ हजार रुपयांमध्ये आम्हाला मिळाल्या होत्या. त्यावेळी १० फुट लांबीचे नव्हे तर १२ फूट लांबीचे ट्रॅक्टर ट्रेलर हे केवळ मोठ्याभाऊंकडे असे, इतरत्र केवळ १० फुटाचे ट्रेलर मिळत असे. श्रद्धेय मोठ्याभाऊंचा नेहमीच गुणवत्तेवर कटाक्ष होता. हेच ट्रॅक्टर आम्ही २५ वर्ष वापरले आणि त्यानंतर एक लाख रुपयांना एकाला विकलेसुद्धा! म्हणजे त्यावेळी गुंतविलेली ही रक्कम पुरेपूर उपयोगी ठरली. एकनाथ बडगुजर यांचे मोठ्याभाऊंशी असलेले ऋणानुबंध दिवसेंदिवस अधिक घट्ट होत गेले. जैन इरिगेशनच्या जैन ठिबक सिंचन प्रणाली, तुषार सिंचन, पाईप्स, फिटींग्ज, सौरबंब, लॅन्टर्न यांसारख्या अनेक बाबींचा त्यांनी आपल्या शेतात आणि शैक्षणिक संस्थेत उपयोग करून घेतला. बडगुजर हे राजाराम धोंडू माध्यमिक विद्यालयाचे चेअरमन आहेत. अनुभूती स्कूलच्या माध्यमातून देखील श्रद्धेय मोठ्याभाऊंचे शैक्षणिक कार्य मोलाचे आहे. मोठ्याभाऊंच्या शैक्षणिक संस्थांमधून मिळणाऱ्या माहितीचा उपयोग ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी निश्चितच होत असतो. त्यांनी आपल्या गाव आणि परिसरात शेतीत आणि

शैक्षणिक संस्थेत नवे प्रयोग सुरू केले.

श्रद्धेय मोठ्याभाऊ हे शेतकऱ्यांचे आधारस्तंभ होते. शेतकऱ्यांच्या केवळ अडचणी समजून घेतल्या नाहीत, तर त्या सोडवण्यासाठी मोठेभाऊ अहोरात्र झटले. शेतकऱ्यांना छळणारा दुष्काळ, कर्जबाजारीपणा, बाजारभाव यांसारख्या प्रश्नांवर त्यांचे गहन चिंतन होते. तेच पहिले कृषी उद्योजक होते की, ज्यांनी कृषिचा वेगळा अर्थसंकल्प सादर व्हावा ही मागणी पहिल्यांदा केली होती. जैन इरिगेशनच्या माध्यमातून उच्च कृषितंत्रज्ञान थेट बांधावर देणे, इतकेच नव्हे तर कांद्यासारख्या अनिश्चितता असलेल्या पिकाला हमीभाव देऊन शेतकऱ्यांना दोन पैसे मिळवून

शिकवले की शेती केवळ उपजीविकेचे साधन नाही, तर ती एक आत्मसन्मानाची, आत्मगौरवाची कार्यसंस्कृती आहे.”

मोठ्याभाऊंनी जगाचा निरोप घेतल्याची वार्ता ऐकून शेतकऱ्यांचा खरा आधारवडच हरपल्याची तीव्र जाणीव एकनाथ बडगुजर यांना झाली. त्यांच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू हे केवळ दुःखाचे नव्हते, तर त्या स्नेहबंधाच्या अमिट आठवणींचे प्रतीक होते, पण या नात्याची गोडी एवढी खोलवर होती की, मोठ्याभाऊंच्या पश्चातही हा स्नेहबंध तसाच टिकून आहे. मोठ्याभाऊंच्या पुढच्या पिढीनेही तोच स्नेह, तिच आपुलकी जपलेली आहे. एकनाथ बडगुजर यांच्या परिवारातील सदस्य



*आपल्या ग्राहकाला नविन फोर्ड ट्रॅक्टरची चावी प्रदान करण्यात आली त्याप्रसंगी शेजारी मोठेभाऊ, दलूभाऊ जैन व इतर*

देण्याचे काम ही मोठ्याभाऊंनी केले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे शेतकऱ्यांना आश्वासक आधार मिळाला. भवरलालभाऊंच्या संवेदनशीलतेमुळे ते शेतकऱ्यांच्या हृदयात कायमचे राहिलेले आहेतच. ‘शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हाच माझा सर्वोच्च पुरस्कार...’ मोठेभाऊ त्यामुळेच म्हणत असत. मोठेभाऊ चांगले श्रोता देखील होते. शेतकऱ्यांचे शांतपणे ऐकूण घेणारे, अडचणी समजून घेणारे, त्यांच्या पाठीशी उभे राहणारे खंबीर व्यक्तिमत्त्व होते. एकनाथ बडगुजर यांच्याशी त्यांचा संवाद हा केवळ व्यवसायाचा नव्हता, तर तो एक जिव्हाळ्याचा, मार्गदर्शकाचा होता. अनेकदा मोठेभाऊ स्वतः फोन करून विचारपूस करत, नव्या संकल्पना सुचवत. त्यांच्या सल्ल्याने घेतलेले निर्णय हे केवळ यशस्वीच नव्हे, तर समाजासाठी प्रेरणादायी ठरले. एकनाथ बडगुजर सांगतात, “मोठ्याभाऊंनी आम्हाला केवळ तंत्रज्ञान पुरविलेले नाही, तर शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिला. श्रम संस्कृतीला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी आम्हाला

आजही जैन इरिगेशनच्या नवसंकल्पनांशी जोडलेले आहेत आणि त्या विचारधारेचा वारसा पुढे नेत आहेत.

आज एकनाथ बडगुजर यांच्या आठवणींमध्ये मोठ्याभाऊंच्या सहवासातील श्रीमंत क्षण, त्यांच्या सल्ल्याने घेतलेले निर्णय आणि त्या निर्णयांनी घेतलेली यशाची उंच झेप हे सर्व जसच्यातसं ताजं आहे. “मी अनेक चांगल्या क्षणांचा साक्षीदार आहे,” असे सांगताना त्यांच्या आवाजात एक गहिरा भाव असतो. ही कहाणी केवळ एका शेतकऱ्याची नाही, तर एका उद्योजकाच्या माणुसकीच्या स्पर्शाने घडलेल्या परिवर्तनाची कहाणी आहे. मोठ्याभाऊंच्या विचारांनी प्रेरित होऊन एकनाथ बडगुजर यांनी त्यांच्या कृषीक्षेत्रातील कार्याला एक नवा चेहरा दिला आणि हे नाते आजही तितक्याच जिव्हाळ्याने अनुबंधित आहे, त्याचा आनंद शब्दांच्या पलीकडला ...

(शब्दांकन - किशोर कुळकर्णी.)



# स्थानिक तंत्रकुशल प्रतिभेचा विकास

## तांत्रिक मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्याचे भाऊंचे धोरण

**डॉ. बाळकृष्ण**
प्रमुख कृषी संशोधन व विकास विभाग जैन हिल्स - ९४२२७७६६७१

शेती क्षेत्रात तंत्रज्ञानाधारित सुधारणा करण्यावर भाऊंचा कायम भर होता आणि त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज होती. कंपनीतील बहुतेक तांत्रिक सहकारी हे परिसरातीलच असून त्यांनी बी.टेक, बीई, बायोटेक, बीएससी अ‍ॅग्री व एमएससी अ‍ॅग्री सारख्या मूलभूत पदव्या पूर्ण केल्यानंतर जैन इरिगेशनमध्ये प्रवेश केला. मोठ्या भाऊंना या सहकाऱ्यांचे तांत्रिक ज्ञान वाढवण्याची आवश्यकता फार पूर्वीच जाणवली आणि त्यासाठी त्यांनी विविध उपाययोजना राबवल्या. आपला सहकारी हा त्या-त्या विषयातील निष्णांत असावा ही भावना त्यापाठी मागे होती.

### उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन

उच्च प्रशिक्षण व शिक्षणाची गरज हे मोठ्या भाऊंनी अतिशय लवकर ओळखले. डॉ. अनिल ढाके यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथून मृदा विज्ञानातील एमएससी पूर्ण केल्यानंतर १९८८ मध्ये जैन इरिगेशनमध्ये प्रवेश केला. भाऊंनी त्यांना “तू पीएच.डी. का करू नयेस?” असे सांगितले व त्यांना पीएचडी करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे विद्राव्य खते (Water Soluble Fertilizer) या विषयावर संशोधन करत १९९५ मध्ये पीएचडी पूर्ण केली. हा विषय त्या काळातील जैन इरिगेशनच्या

व्यवसायासाठीही अत्यंत आवश्यक होता. कारण जैन इरिगेशनने देशात पहिल्यांदा विद्राव्य खतांची आयात केली होती. २००३ मध्ये श्री. मोठ्या भाऊंनी कंपनीतील मास्टर्स पदवीधारक सहकाऱ्यांना पीएच.डी. करण्यासाठी विशेष योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पाच वर्षे फेलोशिप देण्यात येत असे. या योजनेतून आजपर्यंत कंपनीतील २२ सहकाऱ्यांनी विविध विषयांमध्ये पीएचडी पूर्ण केली आहे.

## कंपनीतील काही सहकाऱ्यांचा उल्लेखनीय प्रवास

डॉ. अनिल ढाके हे एमएससी नंतर १९८८ मध्ये कंपनीत रूजू झाले होते, मोठ्या भाऊंच्या प्रेरणेने १९९५ मध्ये त्यांनी आपली पीएच.डी. पूर्ण केली.

डॉ. अनिल बी. पाटील हे १९९४ मध्ये टिश्यू कल्चर विभागात संशोधक म्हणून कार्य सुरू केले त्यांनी २००४ मध्ये पीएच.डी. नोंदणी करून २००८ मध्ये पीएचडी पूर्ण केली आहे.

डॉ. कल्याणी मोहारिर ह्या १९९२ मध्ये बीएससी (Botany) नंतर टिश्यूकल्चर विभागात रूजू झाल्या होत्या. भाऊंच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी मास्टर्स व २०२० मध्ये पीएच.डी. पूर्ण केली.

डॉ. कल्याणसिंग बी. पाटील (KB) हे १९९४ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथून एमएससी हॉर्टिकल्चर पूर्ण करून १९९५ मध्ये ॲग्रोनॉमिस्ट म्हणून रूजू झाले होते. त्यांनी टिश्यूकल्चर केळीचा प्रसार करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले. भाऊंनी त्यांना थेट विचारले — "के.बी, तू पीएच.डी. का करत नाहीस?" तसेही सर्व लोक तुला डॉक्टर म्हणतात तर खरी पीएच.डी. घे आणि एके दिवशी त्यांना स्वतःच विद्यापीठात पाठवून पीएच.डी. नोंदणी करून घेतली. त्यांनी २०२२ मध्ये पीएच.डी. पूर्ण केली.

## पीएचडी विद्यार्थ्यांसाठी विशेष योजना

कंपनीमध्ये विज्ञानविकासाला प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या भाऊंनी आणखी एक योजना सुरू केली. विविध कृषी विद्यापीठांतील पीएच.डी. विद्यार्थी आपले संशोधन कार्य जैन इरिगेशनच्या रिसर्च व डेव्हलोपमेंट फार्म व प्रयोगशाळेत करू शकतील अशी व्यवस्था त्यांनी केली व त्या विद्यार्थ्यांना विशेष फेलोशिपही देण्यात आली. पीएच.डी. पूर्ण झाल्यावर त्यांना प्राधान्याने कंपनीत नोकरीची संधी दिली गेली. या योजनेअंतर्गत आजपर्यंत २४ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली असून त्यापैकी अनेकांनी कंपनीत प्रवेश केला आहे.

## उच्च शिक्षणाधारक सहकाऱ्यांचे ज्ञानवर्धन

केवळ पीएच.डी. पर्यंतच नव्हे तर ज्यांच्याकडे आधीच उच्च शिक्षण आहे अशा सहकाऱ्यांचे ज्ञान अद्ययावत राहावे यासाठी मोठ्या भाऊंनी अनेकांना २-३ महिन्यांसाठी परदेशात प्रशिक्षणासाठी पाठवले. तसेच विविध देशांमध्ये विषयनिहाय आंतरराष्ट्रीय परिषद व परिसंवादांना उपस्थित राहण्याची संधीही दिली. त्यामुळे कंपनीतील सहकाऱ्यांना आंतरराष्ट्रीय संशोधन संस्था व शास्त्रज्ञ यांच्या सोबत काम करायला मिळाले. जगातील अद्ययावत संशोधन व तंत्रज्ञानाचा अभ्यास करून त्याचा उपयोग शेतकऱ्यांचे उत्पादन वाढीसाठी झाला व ते देखील त्यांच्या विषयात पारांगत झाले.



*श्रद्धेय मोठेभाऊंच्या शिल्पाच्या साक्षीने जैन इरिगेशनचे चेअरमन अशोक जैन यांच्याहस्ते पीएच.डी. पदवी स्विकरतांना के.बी.पाटील, सोबत डॉ. बाळकृष्ण यादव व डॉ. अनिल ढाके*

## जैन इरिगेशन मधील पीएच.डी. धारक सहकारी

| क्र. | उमेदवाराचे नाव | मार्गदर्शकाचे नाव | संशोधन विषय | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. अनिल व्ही. ढाके | डॉ. ए. व्ही. मोहिते | एंटिसोल जमिनीत ठिबक सिंचनाद्वारे द्रवरूप खतांचा वापर करून टोमॅटो पिकावरील अध्ययन | १९९५ |
| २ | डॉ. शैलेंद्र वसाणे | डॉ. आर. एम. कोठारी | केळी (ग्रॅण्ड नैन) मध्ये जैवखतांच्या वापरातील वाढ व उत्पादकता यावरील अभ्यास | २००७ |
| ३ | डॉ. अनिल बी. पाटील | डॉ. व्ही. पी. सिंह | कांद्याच्या काही वाणांमध्ये टिश्यूकल्चरद्वारे पुनरुत्पादन, मायक्रो-बल्ब निर्मिती व हॅप्लॉइड प्रेरणा यावरील अध्ययन | २००९ |
| ४ | डॉ. गणेश गुणवंतराव अडसुल | डॉ. आर. एम. कोठारी | कांद्याच्या (Allium cepa L.) काही जर्मप्लाझम लाईन्समधील आनुवंशिक वैविध्य विश्लेषण | २००९ |
| ५ | डॉ. ज्ञानेश्वर जी. पाटील | डॉ. व्ही. आर. सुब्रह्मण्यम | पांढऱ्या कांद्याचे (Allium cepa L.) डायॅलल व मॉलिक्यूलर विश्लेषण | २०१३ |
| ६ | डॉ. प्रदीप सुर्यवंशी | डॉ. ए. बी. चौधरी | बायोगॅस निर्मिती वाढविण्यासाठी सब्स्ट्रेट विशिष्ट सूक्ष्मजीवांचे विलगीकरण व विशेष गुणवर्णन अभ्यास | २०१३ |
| ७ | डॉ. अखिलेश कुमार चौरेसिया | डॉ. व्ही. आर. सुब्रह्मण्यम | केळीत फुलोरा संबंधित जीनचे विश्लेषण - विशेषतः एफटी, सीओ आणि टीएफएल1 | २०१७ |
| ८ | डॉ. योगेश ए. पाटील | डॉ. बाळ कृष्ण | कांद्यातील साइटोप्लाझ्मिक नर-बांझपणाचे मॉलिक्यूलर विश्लेषण | २०१७ |
| ९ | डॉ. अतुल भास्कर पाटील | डॉ. ए. ए. मिश्रा | भारतातील विविध प्रदेशांतील केळीतील ब्रॅक्ट मोज़ेक विषाणूचे मॉलिक्यूलर गुणवैशिष्टे | २०१९ |
| १० | डॉ. विजयेंद्रकुमार दळवी | डॉ. बाळ कृष्ण | कांद्यामधील फुलोरा संबंधित जीनचे मॉलिक्यूलर व कार्यात्मक विश्लेषण | २०१९ |
| ११ | डॉ. हेमंत भगवान पाटील | डॉ. व्ही. आर. सुब्रह्मण्यम | डाळिंबातील फुलोरा-संबंधित जीनचे मॉलिक्यूलर व कार्यात्मक विश्लेषण | २०१९ |
| १२ | डॉ. विकास के. बोरोले | डॉ. ए. व्ही. ढाके | निर्जलीकरण केलेल्या उत्पादनांच्या साठवणूक क्षमते संदर्भात पांढऱ्या कांद्याचा अनुवंशिक अभ्यास | २०२० |
| १३ | डॉ. राकेश शशिकांत चौधरी | डॉ. बाळ कृष्ण | केळीचा दुष्काळ प्रतिरोधक प्रतिसादाचा DREB-२ व NAC ट्रान्सक्रिप्शन फॅक्टर्सचा अभ्यास | २०२१ |
| १४ | डॉ. भावेश लीलाधर जांगळे | डॉ. बाळ कृष्ण | केळीतील तापमान ताणाच्या प्रतिसादात AP२/ERF व MYB/MYC ट्रान्सक्रिप्शन फॅक्टर्सचा अभ्यास | २०२१ |
| १४ | डॉ. विकास अग्निहोत्री | डॉ. सुधांशु भारद्वाज | ताजा कांदा व निर्जलित उत्पादनांतील सूक्ष्मजीव प्रोफाइल व कोलीफॉर्म नियंत्रण उपाय | २०२० |
| १५ | डॉ. हेमंत भांडारकर | डॉ. सुधांशु भारद्वाज | फळ प्यूरी व ज्यूस कॉन्सन्ट्रेटमध्ये Alicyclobacillus प्रजातींचे विलगीकरण, ओळख व नियंत्रण उपाय | २०२१ |
| १६ | डॉ. सुमेरसिंग पाटील | डॉ. बाळ कृष्ण | आंब्या (Mangifera indica L.) मधील फुलोरा संबंधित जीनवरील अध्ययन | २०२१ |
| १७ | डॉ. कल्याणसिंग बी. पाटील | डॉ. बाळ कृष्ण | टिश्यूकल्चरद्वारे निर्मित डाळिंब रोपांसाठी हार्डनिंग तंत्र विकसित करणे | २०२३ |
| १८ | डॉ. कल्पना जैन | डॉ. ए. बी. चौधरी | — | |
| १९ | डॉ. कल्याणी भामरे | डॉ. सुधांशु भारद्वाज | बायोगॅसमधील जैविक $H_2S$ काढण्यासाठी Thiobacillus प्रजातींचे विलगीकरण व निवड | २०२४ |
| २० | डॉ. कल्याणी मोहरिर | डॉ. ए. ए. मिश्रा | ऊतकसंवर्धित केळीच्या प्राथमिक हार्डनिंगवरील अध्ययन | २०२३ |
| २१ | डॉ. अमोल चौधरी | डॉ. एस. श्रीधरन | ठिबक व फर्टिगेशन अंतर्गत UHDP आंबा बागांतील कीड व्यवस्थापन | २०१५ |
| २२ | जितेंद्र पाटील | डॉ. बाळ कृष्ण | स्ट्रॉबेरी (स्वीट चार्ली) मधील उतिसंवर्धन तंत्रज्ञान अभ्यास | २०२५ |

# गुणवत्तेच्या ध्येयवादामुळे जैन इरिगेशनचा जगभर नावलौकिक



शून्यातून विश्व निर्माण करताना शिक्षण हाच केंद्रीभूत पाया मानलेल्या भवरलालजींनी आयुष्यभर जळगावात राहून जळगावच्या भूमीत ‘वर्ल्ड क्लास’ (आंतरराष्ट्रीय दर्जाच्या) संस्था उभारल्या. ही अत्यंत मोलाची आणि दुर्मिळ गोष्ट आहे. पैसे आणि भांडवल असले की सर्व काही होते, असा अनेकांचा गैरसमज आहे. तसे असते तर सरकारचे पैठणचे संतपीठ, रामटेकचे कालिदास विद्यापीठ आणि औरंगाबादचे (छत्रपती संभाजीनगर) कायदा विद्यापीठ यांना शिकवण्यासाठी चांगली, अनुभवी, तज्ज्ञ आणि नामांकित माणसे मिळत नाहीत म्हणून अडचणी निर्माण झाल्या नसत्या. मोठ्याभाऊंनी मायक्रो इरिगेशन (सूक्ष्मसिंचन), जैवतंत्रज्ञान (बायोटेक्नॉलॉजी), केळी निर्यातीसाठीच्या मूलभूत व पायाभूत सुविधा, टिश्यूकल्चर तंत्राद्वारे कोट्यवधी रोपे-कलमे तयार करणाऱ्या प्रयोगशाळा व फॅक्टरी, प्रक्रिया उद्योग आणि अनेक संस्था व उद्योग हे सर्व स्थानिक कर्मचारी व कंपनीतील सहकाऱ्यांच्या मदतीनेच उभे करून यशस्वीरित्या चालवून दाखविले. यासाठी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना देश-विदेशात अभ्यासासाठी व प्रशिक्षणासाठी पाठवून त्यांना तंत्रकुशल आणि विद्याविभूषित बनविले. त्यांच्या मनात ध्येयवाद, कामाची प्रेरणा आणि आत्मविश्वास निर्माण केला. या सर्वांसाठी लागणारे बळ, साधनसामग्री आणि खर्च याबाबत भाऊंनी कधीही तडजोड केली नाही; उलट सर्वोत्तम गुणवत्तेला प्राधान्य देत नेहमीच सहकाऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले. त्यामुळेच “जैन इरिगेशन म्हणजे गुणवत्ता, उत्कृष्ट दर्ज्याचा माल” असे समीकरण जगभर पसरले. अर्थात, यामागे भवरलालजींचा प्रचंड अभ्यास, अविरत मेहनत, दूरदृष्टी, कल्पकता, ध्येयवाद आणि प्रखर निष्ठा कारणीभूत ठरली—हे सत्य नाकारता येत नाही.



*पीएच.डी. मिळविल्यानंतर अशोक जैन यांच्या हस्ते गौरव स्विकारताना सौ. कल्याणी मोहरीर सोबत किरण मोहरीर व डॉ. अखिलेश मिश्रा*

## मायक्रो-इरिगेशनसाठी प्रशिक्षित अभियंत्यांची कमतरता

मायक्रो इरिगेशन व्यवसायासाठी प्रशिक्षित अभियंत्यांची उपलब्धता अत्यंत कमी होती. हे लक्षात घेऊन मोठ्या भाऊंनी बी.टेक ॲग्रीकल्चर इंजिनिअरींग आणि बीएसस्सी ॲग्रीकल्चर विद्यार्थ्यांसाठी जैन हिल्स येथे एक महिन्याचा मोफत प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला.

एकदा मी भाऊंना विचारले, “आपण इतक्या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग देतो, पण सर्वांना नोकरी देऊ शकत नाही. त्यापैकी बरेच जण आपल्या स्पर्धक कंपन्यांकडे जातील. मग आपण फक्त ज्यांना नोकरी देतो त्यांनाच प्रशिक्षण दिले तर बरे नाही का?”

यावर भाऊ म्हणाले “ते इतर कंपन्यांमध्ये गेले तरी प्रथम आपली उत्पादनेच त्यांना माहिती असतात.”

यातून भाऊंचा दूरदृष्टीपूर्ण विचार दिसून येतो—ज्ञानाचा प्रसार झाला तर उद्योग, शेतकरी आणि देश तिन्ही पातळ्यांवर विकास घडतो.

# कोटी काळजांची आराधना...



सुवर्णमयी त्या दिसाची
ती अवतरली सोनेरी पहाट
शेती-मातीतले सगेसोयरे
आतुरतेने पहात बसले वाट

योग अनोखा घडला भू-वरी
जुळल्या विश्वाशी जिवाभावाच्या गाठी
कृषी जगतातला हा तारा
अवतरला आई गौराईच्या पोटी

खेळले.. रमले.. वाकोद मातीत....
सख्यं वाघुरच्या पाण्याशी जपले
प्रज्ञावंताच्या नाना कल्पकतेने
कृषी पर्व प्रकाशले ....

शेती-मातीच्या संस्कारांनी
पोहचविलं सातासमुद्रपार
मानाच्या जलबिंदूवर
भाऊ तुम्ही स्वार....

थेंबाथेंबाचे कर्तृत्व
झाले आभाळाएवढे..
सच्चे भूमिपुत्र होऊनी
कार्यकर्तृत्व जगावेगळे


अशा कर्मवीर किमयागाराची
गावी थोरवी पुन्हा पुन्हा
तुमच्या निरामय आयुष्यासाठी होते
कोटी काळजांची आराधना...

- नामदेव बडगुजर
जैन प्लास्टिक पार्क, जळगांव

Post Regn. No.: JAL/४१७/२०२५-२०२७
Published on ११th of every month, posted on २८th of every month at Jalgaon-४२५००१
RNI NO. MAHMAR/२०१८/७६९४४

# १२८ वर्षांची मातीची कहाणी

(१८९७-२०२५)



रा जस्थानातील मारवाड-आगोळाई गावातून पाण्याच्या शोधात दोन युवक बाहेर पडले.
ते साल होतं १८९७ सव्वाशे वर्ष झाली या गोष्टीला. जवारमलजी आणि धाकटा छोटमलजी.

जोडी थेट पोचली अजिंठ्याच्या पायथ्याशी. मुक्काम वडाळी - वाकोद, जिल्हा जळगाव. हाती रिकामा लोटा, उरात अफाट जिद्द. रुजलेल्या कठोर परिश्रमाचा बांधा, भविष्य घडविण्याची अपरंपार उमेद.

जवारमलजींची तीन अपत्यं, सागरमलजी, मुकनचंदजी, हस्तीमलजी. सागरमलजींचे चिरंजीव हिरालालजी यांचा नित्यक्रम-

रामप्रहरी धार काढून गडी-माणसांना उठवायचं, ऊन-पाऊस-वारा यांची तमा न बाळगता चालायला लागायचं. शेती-माती करायची,धान्य-दाण्याची देवघेव करायची. पै-पैका शिलकी टाकायचा. पुन: शेतीतच लावायचा. शेती वाढवायची.

*मोठ्या एकत्र कुटुंबाला गुण्यागोविंदानं नांदवायचं.* हे सगळं करत असताना माणुसकी जपायची. प्रेम द्यायचं, सग्या-सोयऱ्यांपेक्षा शेजार, शहरापेक्षा गाव जवळचं मानायचं. धनाजी वानखेडे असो वा नामदेवराव देशमुख अर्ध्या रात्रीही परस्परांच्या हाकेला धावून जायचं! कै. हिरालालजी व गौराबाईच्या कुंडल्यात विचित्र ग्रहांची युती. ओळीनं चार अपत्यं जगली नाही म्हणून पाचवं हरिजनाच्या ओटीत टाकलं, जगलं. त्याचं नाव भवरलाल, धाकटा कांतीलाल.

आजही तळागाळातल्या माणसाबद्दल व वाकोद-जळगावबद्दल प्रेम, कृतज्ञता, त्यांनीच हे जीवन दिलं ही भावना कायम दिसून येते. त्यांचे पांग याच जन्मात फेडायसाठी सारखी तळमळ, आकांक्षा, धडपड.

वाडवडिलांनी पाण्यासाठी दाहीदिशा शोधल्या. भवरलालजींनीही तोच ध्यास घेतला.

पाणी नियोजनाचा. पिढ्यापिढ्यांना जोडणारा हाच अंतरीचा धागा !

त्याला जोड दिली नवतंत्राची, ज्ञानाची, संशोधनाची, मातीच्या बांधिलकीचं तर बाळकडूच होतं. राणीदानजी, बन्सीलालजी, दलीचंदजी, शिवराजजी, कांतीलालजी, गिरिधरलालजी यांच्या साथसोबतीने भवरलालजींनी उद्योगाची पायाभरणी केली. निष्कलंक चारित्र्य हा वारसा पिढ्यानपिढ्या होताच. साधेपणा आणि सदाचार रक्तातच. संयुक्त कुटुंबातील सर्वांचं जगणं खुल्या पुस्तकासारखं, कुणाला कोणी शिकवलं नाही. परस्परांकडे पाहूनच ते आपसूक घडत गेले.

हा हा म्हणता रोपट्याचा कल्पवृक्ष झाला. पुढची पिढी आली.

भवरलालजींचे आणि कांताईंचे अशोक, अनिल, अजित, अतुल व कांतीलालजींचे आणि शकुंतला यांचे अभय, अविनाश वारसा सांगूनच मोठी झाली. डोक्यावरची पगडी गेली, टोपीही गेली, हातात मोबाईल व प्रसंगी गळ्यात टाय आला. बैलगाडी गेली. विमानं आली.

- शेती आधारीत व्यवसाय मात्र कायम राहिले. भूमिपुत्रांचा आर्थिक स्रोत उन्नत करणारे कृषिविषयक प्रकल्प वाढले. शेतकऱ्यांच्या भरभक्कम सहकार्याने वाढत्या उद्योगासोबत सहकाऱ्यांच्या संख्यात्मक-गुणात्मक वाढीसह कारखाने, कार्यालयेही वाढली. वाकोद ते थेट जगभर आंतरराष्ट्रीय स्तरावरचा व्याप सहकाऱ्यांच्याही परिश्रमाने आणि बांधिलकीने विस्तारला. भारत सरकारद्वारा भवरलालजी 'पद्मश्री'ने सन्मानित झाले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्काराने वेळोवेळी विभूषितही झाले, कर्मभूमीशी असलेलं नातं मात्र कायम राहिलं. आजही. अशोकला ज्योतीची, अनिलला निशाची, अजितला शोभनाची तसेच अतुलला भावनाची आत्मीयतापूर्वक साथसोबत लाभली, संयुक्त परिवाराचा वसा आणि वारसा परंपरेने चौथी पिढीही प्रेमाने सांभाळताहेत... चौथी पिढी - अथांग-अंबिका, अमोली, अभेद्य, आशुली, आरोही, अभंगसुद्धा त्याच व्यवसायात जुडली. आत्मन आणि अन्मय याच वाटेवर येतील...

अजूनही भली पहाट सोबत्यांच्या साथीनंच उगवते.

आजही अशोकजींच्या बरोबर 'घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला' भूपाळीसह कोवळ्या उन्हातल्या ऋचा कानावर घेत अर्थम्, भवरलालजींचा आणि कांताईंचा पणतू पहाट आनंददायी करतो...

सव्वाशे वर्षांच्या कहाणी, परंपरेची, साठा उत्तरांची, सुफळ तर झालीच पण निरंतर प्रवाहितही आहे...
जगण्याला अर्थ देणाऱ्या थेंबापासून शाश्वततेचा भावार्थ देणाऱ्या तीर्थापर्यंत...



भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन
www.bkjfoundation.org

गांधी रिसर्च फाऊंडेशन
• सत्य • अहिंसा • शांती
www.gandhifoundation.net

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.
www.jains.com

जैन फार्मफ्रेश
जैन फार्म फ्रेश फुड्स लि.
www.jainfarmfresh.com

अनुभूति स्कूल
www.anubhutischool.in

कांताई नेत्रालय
आय केयर फॉर यू

कृषीतीर्थ मासिकाची डिजीटल आवृत्तीसाठी कोड स्कॅन करा